CMYK

आयपीएल सामना क्र.३९

गुजरात टायटन्स
विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स

वेळ : सायं.३.३० वा.
स्थळ : ईडन गार्डन, कोलकाता

अस्सल सोलापुरी

# सुराज्य
सोलापूर


सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

आयपीएल सामना क्र.४०

दिल्ली डेअरडेव्हिल्स विरुद्ध
सनरायझर्स हैद्राबाद

वेळ : सायं.७.३० वा.
स्थळ : अरुण जेटली स्टेडियम, दिल्ली

www.surajyadigital.com | शनिवार, दि.२९ एप्रिल २०२३ | वर्ष : २१ वे ▸ अंक : २१० वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८



# ‘अवकाळी’चा रूद्रावतार, सोलापुरात उडाला हाहाकार

## झाडे पडली | विजेची खांबे वाकली | तारा तुटल्या | अखख्या शहरावर अंधार

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**सोलापूर शहरात शुक्रवारी अवकाळीच्या पावसाने प्रचंड धुमाकूळ घातला. साडेचारच्या सुमारास साधारण पाऊणतास मुसळधार पावसाने शहराला झोडपून काढले. वादळी वाऱ्याने शहरातील झाडे उन्मळून पडली. विजेच्या तारा तुटल्याने शहराचा वीज पुरवठा खंडित झाला. अख्ख्या सोलापूरवर अंधाराचे साम्राज्य पसरले होते. काम आटोपून घरी परतणाऱ्या चाकरमान्यांना अंधारातूनच वाट काढावी लागली. ढगांच्या गडगडाटाने धरणी हादरली तर विजांच्या कडकडाटाने कानठळ्या बसल्या. अवकाळीच्या या रूद्रावताराने शहरात हाहाकार उडाला.सायंकाळी बाहेर पडलेल्यांना आसरा घेण्यासाठी धडपड करावी लागली. भाजी व आंबे विक्रेते, फेरीवाले यांचे प्रचंड झाले. सायंकाळी सहानंतर संततधार सुरूच राहिली तर अष्टदिशांना ढगांची गडगड सुरूच होती.**



**अकरा ठिकाणची वर्दी... :** शहरात अकरा ठिकाणी झाडे उन्मळून पडली व रस्त्यांवर अडथळा निर्माण झाल्याने वाहतूक ठप्प झाली होती.अग्निशामक दलाचे श्री.आवटे,नगर अभियंता श्री.चलवादी व उद्यान प्रमुख श्री.दिवाणजी व त्यांच्या टीमने लागलीच मदत कार्य हाती घेतले.यंत्रणा आणून झाडे बाजूला काढली व रस्ता मोकळा करून दिला.दयानंद कॉलेज,जुना एम्प्लॉयमेंट चौक,सातरस्ता,दत्त चौक,जुळे सोलापूर,अवंती नगर व पूनम गेट याठिकाणी झाडे पडली होती.

गेल्या चार दिवसांपासून प.महाराष्ट्र व मराठवाड्यात अतिवृष्टीचा इशारा हवामान खात्याकडून दिला गेला होता. मराठवाड्यात व विदर्भात दोन दिवसांपूर्वी पुन्हा गारपीट झाली पण सोलापुरात केवळ ढगाळ हवामान होते. सकाळी दहा वाजल्यापासूनच उकाडा जाणवत होता. दुपारीनंतर आकाश ढगांनी व्यापले. वाऱ्याने पावसाची आगाही दिली. दुपारी साडेचारनंतर वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. काळसर ढगांनी शहरावर अंधार होता. जणू काळोखच. जोरदार वाऱ्यासह पाऊणतास मुसळधार पावसाने शहराला झोडपून काढले. वादळी वारा काय असतो? हे साक्षात सोलापूरकरांना पहायला मिळाले.

### वीज कर्मचाऱ्यांची दमछाक...

वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर शहरातील वीज कार्यालयांचे फोन खणखणू लागले. अधिकाऱ्यांसह वायरमन कर्मचारी लागलीच कामाला लागले पण करणार काय? आकाश फाटल्यागत त्यांची अवस्था झाली होती. विजेची खांबे आडवी झाली होती. झाडे तारांवर पडली होती. त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला. फॉल्ट हुडकण्यात वीज कर्मचाऱ्यांचा खूप वेळ गेला. रात्री नऊनंतर शहराच्या काही भागात वीज पुरवठा सुरू झाला पण तोही अत्यंत कमी दाबाने. रात्री दहानंतरही निम्मे शहर अंधारात होते. जोरदार वाऱ्यामुळे वाडिया हॉस्पीटल जवळ मोठे झाड कोसळले. विजेचे खांबही पडले. तुराट गल्ली, न्यू तिर्हेगाव, कोनापुरे चाळ, फॉरेस्ट, चांदणी चौक, कुमार चौक येथील नागरिकांच्या घरांमध्ये पावसाचे तसेच तुंबलेल्या ड्रेनेजचे पाणी शिरल्यामुळे धान्य व घरगुती वस्तुचे नुकसान झाले आहे.

### अभिमानश्री नगर येथील घरावर वीज पडली...

शुक्रवारी दुपारी झालेल्या मुसळधार पावसाच्यावेळी शहरातील पुणे नाका अवंती नगर भागातील अभिमानश्री नगर येथील एका घरावर वीज पडली.मोठ्या आवाजाने सर्वत्र घबराट पसरली. अभिमानश्री नगर येथील रेणुकामाता मंदिराजवळ राहणाऱ्या विष्णू वाघचौरे यांच्या घरावर वीज पडली. घराच्या छतावर वीज पडल्याने सज्जा काही प्रमाणात ढासळला तसेच छताला मोठे छिद्र पडले. यात सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. विष्णू वाघचौरे, महानंदा थिटे, शब्बीर शेख यांच्या घरातील टीव्ही, फ्रिज, पंखे आदी वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. माजी पालकमंत्री आमदार विजयकुमार देशमुख यांनी विष्णू वाघचौरे यांच्या घरी भेट दिली व तहसीलदारांना पंचनामाचे आदेश देऊन लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळावी, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्याशी चर्चा केली. यावेळी किरण पवार, पवन वाकचौरे, सज्जन वडणे, रमेश लोंढे, सुरेश भंडारी, राजू सुरवसे, अरविंद अंदुरे, वकील महादेव गोटे, संतोष भिसे, पराग काळे, संदीप चेळेकर, विश्वास साठे, विकास शिंदे, बाबा शेख आदी उपस्थित होते.

# महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना घरपोच मिळणार निकाल

## वाढत्या उन्हामुळे निर्णय : जाधवर

सुराज्य/सोलापूर

उन्हाची तीव्रता लक्षात घेता महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळातर्गत असलेल्या सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेचा निकाल (प्रगतिपुस्तक) घरपोच देण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी हनुमंत जाधवर यांनी दिली. सध्या कडक उन्हाळा आहे. यामुळे उन्हाची तीव्रता अधिक आहे. परिणामी विद्यार्थ्यांना त्याची बाधा होऊ नये. खारघर येथील उष्माघाताच्या घटनेनंतर आता प्रशासनही दक्षता घेत आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्याही आरोग्याची काळजी घेण्यात येत आहे.

दरम्यान, कडक उन्हामुळे महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या अंतर्गत असलेल्या शाळातील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र दिनी १ मे रोजी सकाळी ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या घरीच परीक्षेचा निकाल देण्यात येणार आहे. त्या त्या शाळेमधील शिक्षक हे संबंधित विद्यार्थ्यांना घरी जाऊन परीक्षेचा निकाल देणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत येण्याची आवश्यकता नाही. घरबसल्या त्यांना निकाल मिळणार आहे. या संदर्भात संबधितांना शनिवारी सूचनाही देण्यात येत असल्याचे महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी हनुमंत जाधवर यांनी स्पष्ट केले.



**२४० शिक्षक देणार घरपोच निकाल**

सोलापूर महापालिकेत अंतर्गत असलेल्या विविध माध्यमांच्या ५८ शाळांमध्ये एकूण ५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच २४० शिक्षक आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या मार्फत महाराष्ट्र दिनी घरपोच परीक्षेचा निकाल मिळणार आहे.

# बृजभूषण सिंह यांच्याविरोधात अखेर गुन्हा दाखल

**नवी दिल्ली :** भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष बृजभूषण सिंह यांच्याविरोधात दिल्ली पोलिसांनी रात्री उशीरा अखेर गुन्हा नोंदवला. पॉस्कोसह विविध कलमे सिंह यांच्यावर लावण्यात आली आहेत. त्यामुळे सिंह यांच्या अडचणीत वाढ झाली आहे.

**पॉस्कोसह अन्य कलमे लावली**

सिंह यांच्याविरोधात सात महिला खेळाडूंनी लैंगिक शोषणाची तक्रार केली होती. याचा गुन्हा नोंदवणार असल्याची माहिती दिल्ली पोलिसांनी सर्वोच्च न्यायालयात दिली. त्यानुसार दिल्ली पोलिसांनी हा गुन्हा नोंदवला.न्यायालयाने गुन्हा नोंदवण्याचे आदेश देताच सिंह यांनी प्रतिक्रिया दिली. सिंह म्हणाले, न्यायालयाच्या आदेशाने मी आनंदी आणि प्रसन्न आहे.

दिल्ली पोलिसांना गुन्हा नोंदवून तपास करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. मी दिल्ली पोलिसांना तपासात सहकार्य करणार आहे. या देशात न्यायपालिकेपेक्षा कोणी मोठ नाही. मीही न्यायपालिकेपेक्षा मोठा नाही. आतापर्यंत गुन्हा दाखल झाला असेल किंवा दाखल होत असेल. मी न्यायालयाच्या आदेशाचे स्वागत करतो, असे सिंह यांनी सांगितले.

# खंडणी मागणाऱ्या तिघांना गुन्हे शाखेकडून अटक

**सोलापूर :** सोलापूर जिल्हा ग्रामीण डाक सेवक कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन राजकुमार नागनाथ आतकरे (वय-४७, रा.मु. पो. देगाव ता.मोहोळ) यांना खंडणी मागणाऱ्या तिघा आरोपींची शहर गुन्हे शाखेने मुसक्या आवळल्या असून,त्यांच्या ताब्यातून खंडणी करता मागितलेली २५ हजारांची रक्कम जप्त करण्यात आले आहे.

आतकरे यांनी पतसंस्थेने बांधकाम परवाना नसताना बिल्डींग,खरेदी केली व मयत कर्मचारी यांचे नावाने खोटे कर्ज काढल्याची तक्रार करून खंडणीखोर यांना त्रास देत होते.ही तक्रारी पाठीमागे घेण्याकरीता तसेच सामाजिक माध्यमाद्वारे बदनामीकारक माहिती प्रसारीत करणे थांबवायचे असेल तर पैसे द्यावे लागतील म्हणुन




खंडणीची मागणी होत होती. कंटाळून त्यांनी पोलीस आयुक्त यांच्याकडे तक्रारी अर्ज दिला होता.२७ एप्रिल २०२३ रोजी तक्रारदार यांनी खंडणी मागणाऱ्या इसमाना खंडणी पोटी रक्कम ३ लाख रुपयामधील पहिला हप्ता ४५ हजार रुपये देण्याकरीता शिवशक्ती हॉटेल जुना पुना नाका सोलापूर या ठिकाणी बोलविले तेथे त्या ठिकाणी आल्यावर कळल्याने तात्काळ पोलीस पथकासह त्या ठिकाणी छापा कारवाई करण्यात आली.त्यामध्ये खंडणी मागणारे इसम राजशेखर मल्लप्पा जेऊरकर (वय-४३) मस्काराध्य संगमनाथ हिरेमठ (वय-३२) अनमोल अनिल कवटे (वय-३२, रा.सर्वजण. सकलेश्वर गल्ली मंदुप, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर) या सर्वांना खंडणीच्या रोख रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले.

त्यांच्यावर फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कामगिरी पोलीस आयुक्त राजेंद्र माने पोलीस उपायुक्त.डॉ.दिपाली काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे, यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक जीवन निरगुडे, संतोष मोरे, वाजीद पटेल, महेश शिंदे, संजय साळुंखे, कुमार शेळके चालक बालू काळे यांनी केली आहे.

# घटस्फोटीत महिलेवर अत्याचार; पाच जणांविरूद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर :** विवाहविषयक संकेतस्थळावरून संपर्क साधत महिलेशी वेळोवेळी शरीर संबंध ठेवले. त्यावेळी काढलेले फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत पीडित महिलेवर अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे.

ही घटना ऑक्टोबर २०२२ ते २४ मार्च २०२३ दरम्यान घडली. याप्रकरणी पीडित महिलेने विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून त्यांच्या फिर्यादीवरून पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संतोष नामदेव पवार, वर्षा विठ्ठल इरकशेट्टी, मनोज भारत देवकर, ब्रह्मा माशाळे, रवींद्र अप्पासाहेब भोपळे असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.



पीडित महिलेचा घटस्फोट झालेला असताना जीवनसाथी डॉट कॉमवर संतोष पवार याने संपर्क साधून मला तू खूप आवडतेस मी तुझ्यासोबत लग्न करणार आहे व तुझ्या दोन्ही मुलींना सांभाळण्यास तयार आहे. असे म्हणत तिच्यावर अत्याचार केला.त्यानंतर पीडित महिलेला सोलापुरातील एका घरात नेऊन त्या महिलेला सॉफ्ट ड्रिंकमध्ये औषध देऊन पीडित महिलेला गुंगी आली व काही वेळानंतर ती महिला शुद्धीवर आली असता,तिच्या पोटात दुखू लागले. त्यावेळी संतोष पवार याने जबरदस्तीने शरीरसंबंध केल्याचे लक्षात आले. त्यावेळी पीडित महिलेने संतोष पवार यांच्याशी बोलणे टाळू लागल्यानंतर पवार याने शरीर संबंधाचा व्हिडिओ माझ्याकडे आहे. त्यामुळे तू जर माझ्यासोबत शरीर संबंध केले नाहीस तर व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करेन, अशी धमकी दिली. त्यावेळी फिर्यादी ही गप्प बसली. त्यानंतर १ नोव्हेंबर २०२२ रोजी पीडित महिलेने संतोष पवार याला विवाहाबद्दल विचारणा केली असता तो उडवा-उडवीचे उत्तर देऊ लागला.

त्यानंतर पीडित महिलेच्या परिचयाचे वर्षा इरकशेट्टी व मनोज देवकर यांच्या मदतीने विजापूर नाका पोलीस ठाणे येथे तक्रार देण्यासाठी पीडित महिला गेली असता त्या ठिकाणी संतोष पवार याने लग्न करतो, असे आश्वासन दिले तसेच संतोष पवार याचे वर्षा इरकशेट्टी व मनोज देवकर यांच्यासोबत ओळखीचे व घनिष्ठ संबंध असल्याचे लक्षात आले. संतोष पवार याने पीडित महिलेची मुलगी ही अज्ञान असल्याचे माहीत असून देखील तिच्यावर देखील बळजबरी व विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. संतोष पवार याची पहिली पत्नी जिवंत असून तिचा खोटा मृत्यू दाखला दाखवून पीडित महिलेची फसवणूक केली आहे. तसेच वरील संशयित आरोपीने पीडित महिलेची फसवणूक करून बेकायदेशीररीत्या वेश्या व्यवसाय करीत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेचे नोंद विजापूर नाका पोलीस ठाण्यात झाली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपलंही असच झालंय, मोठं वादळ आल की आपण अंधारात !

कल्याण
580-38-378

मेन बाजार
469-93-300

# संयुक्त तडजोड प्रस्तावाला लवादाने दिली मंजुरी

## ● पोचमपाडबरोबरच्या करारानंतर दुहेरी जलवाहिनीचे काम होणार लवकरच सुरू

सुराज्य/सोलापूर

**स्मार्ट सिटी आणि पोचमपाड मधील संयुक्त तडजोड प्रस्तावावर लवादाने शुक्रवारी निवाडा (अवॉर्ड) घोषित केला आहे. स्मार्ट सिटी व पोचमपाडमधील संयुक्त तडजोड प्रस्तावाला लवादाने मंजुरी दिली. यामुळे पोचमपाड बरोबर करार केल्यानंतर तत्काळ दुहेरी जलवाहिनीचे काम सुरू करण्यात येणार आहे. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही होणार असल्याची माहिती स्मार्ट सिटीच्या सीईओ शीतल तेली-उगले यांनी दिली आहे.**

उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनी कामा संदर्भात जुना मक्तेदार असलेल्या पोचमपाड कंपनीने लवादात धाव घेतली होती. या संदर्भात स्मार्ट सिटी व पोचमपाड कंपनी यांच्यात तडजोड करण्यासंदर्भात नियम अटी शर्तीचा अंतिम संयुक्त प्रस्ताव दीर्घ चचनंतर तयार करण्यात आला. या संदर्भात शुक्रवारी रोजी पुणे येथे लवादाकडे सुनावणी झाली. स्मार्ट सिटी व पोचमपाड कंपनीच्या वतीने अटी शर्तीचा संयुक्त तडजोड प्रस्ताव लवादाकडे सादर करण्यात आला. त्यावर सुनावणी झाली. त्या संयुक्त प्रस्तावास लवादाने मंजुरी दिली आहे. लवादाने निवाडाही घोषित केला आहे. त्यानंतर त्याप्रमाणे पुढील कार्यवाही होणार आहे, असे सीईओ शितल तेली - उगले यांनी स्पष्ट केले. सुनावणीवेळी हा संयुक्त तडजोड प्रस्ताव सादर करण्यासाठी त्या स्वतः हजर होत्या.



नियोजन भावनात झालेल्या मागील बैठकीत ११० एम एल डी योजनेतील जुन्या कामा संदर्भात जुना मक्तेदार पोचमपाड कंपनीने १२८ कोटी रुपये अधिक खर्च झालेली रक्कम मागणी केलेली आहे तर दुसरीकडे स्मार्ट सिटी कंपनी १८७ कोटी झालेली नुकसान भरपाई मागणीचा दावा केला होता.

मात्र दावा प्रतीदावा करण्यात आला. एकमत झाले नव्हते. दरम्यान, अखेर शुक्रवारी स्मार्ट सिटी व पोचमपाड कंपनीने अटी शर्तीचा संयुक्त तडजोड प्रस्ताव लवादाकडे सादर करण्यात आल्यानंतर लवादाने निवडा घोषित केला आहे.

### लवकरच कार्यवाही करण्यात येणार : आयुक्त

आता उजनी-सोलापूर समांतर जलवाहिनीच्या कामासंदर्भात पोचमपाड कंपनीशी करार करण्यात येणार आहे. या जलवाहिनीचे काम पोचमपाड कंपनी करणार आहे. लवकरच ही कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यानंतर उजनी-सोलापूर समांतर जलवाहिनीचे काम लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचेही सीईओ शितल तेली- उगले यांनी स्पष्ट केले.

CMYK

# सर्वसमावेशक राजकारणी

पंजाबचे माजी मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल यांच्या निधनाने भारतीय राजकारणातील एक सर्वसमावेशक राजकारणी नेता आपल्यातून निघून गेला आहे. बादल यांच्या जाण्याची मीडियाने विशेष नोंद घेतली नाही. सरपंच ते मुख्यमंत्री असा त्यांचा राजकीय प्रवास विलक्षण होता. १९२७ मध्ये जन्मलेल्या बादल यांनी वयाच्या २०व्या वर्षी सरपंच म्हणून कारकिर्दीला सुरुवात केली. सरपंच होण्यापूर्वी त्यांना सरकारी नोकरी करण्याची इच्छा होती. महसूल अधिकारी म्हणून नियुक्तिपत्रही मिळाले. मात्र त्यांच्या एका नातेवाईकाने हे नियुक्तिपत्र फाडले. नोकरी करण्यापेक्षा, 'नोकरी देणारा हो' असा सल्ला दिला. त्यामुळे ते राजकारणात उतरले. १९५७ मध्ये पहिल्यांदा बादल काँग्रेसकडून आमदार झाले. पुढे १५ मार्च १९६० मध्ये अकाली दलाच्या कार्यकारी समितीने काँग्रेसकडून जे निवडून आले आहेत, त्यांनी राजीनामे द्यावेत असे फर्मान काढले. बादल यांनी त्या वेळी राजीनाम्यास नकार दिला. पुढे १९६७ मध्ये अकाली दलाकडून त्यांनी विधानसभा निवडणूक लढवली. गिरीधरबहा मतदारसंघात काँग्रेस उमेदवाराकडून ते केवळ ५७ मतांनी पराभूत झाले. याच वेळी त्रिशंकू विधानसभा अस्तित्वात आली. तीन आघाडी सरकारे या कालावधीत गडगडली. अखेर बादल यांनी २६ मार्च १९७० रोजी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. पुढे मात्र त्यांचे संपूर्ण राजकारण काँग्रेसविरोधाचे राहिले. पंजाबमध्ये दहशतवाद वाढीस लागला असतानाही, बादल यांनी देशाच्या बाजूने राहात फुटीरतावाद्यांना चपराक लगावली. फुटीरवादाची भाषा करणाऱ्या सहकाऱ्यांनाही त्यांनी



कधी थारा दिला नाही. नेहमी उदारमतवादी राजकारणाला प्राधान्य दिले. वैचारिक मतभेद असतानादेखील जनसंघाबरोबर त्यांनी सर्वप्रथम आघाडी केली. १९६६ मध्ये पंजाब राज्याची स्थापना झाल्यानंतर त्यांच्या अकाली दलाची वाटचाल एक धार्मिक गट ते पंजाबी जनतेचे हित जोपासणारा पक्ष अशी झाली. १९९६मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या अल्पमतातील केंद्र सरकारला पाठिंबा देणारा त्यांचा पक्ष पहिला होता. पुढे वर्षभरात अकाली दल-भाजप यांची आघाडी झाली. ही आघाडी २५ वर्षे टिकली. दीर्घकाळ आघाडी टिकण्याचे देशाच्या राजकारणातही हे एक वैशिष्ट्य ठरले. नंतर कृषी कायद्यांवरून अकाली दल हा भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीतून बाहेर पडला. तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदी व प्रकाशसिंग बादल यांचे संबंध सौहार्दाचे होते. बादल यांच्या नेतृत्वात अकाली दलाने २००७ व २०१२ अशी दोन वेळा सलग पंजाब विधानसभेची निवडणूक जिंकली. ही राज्याच्या राजकारणातील ऐतिहासिक घटना आहे.केंद्रात मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात बादल यांनी जबाबदारी सांभाळली. राष्ट्रीय पातळीवर विविध नेत्यांशी त्यांचे सौहार्दाचे संबंध होते. वयाच्या २५व्या वर्षी ते आमदार झाले. ते देशातील सर्वात तरुण आमदार ठरले. तर १९७० मध्ये ४३ व्या वर्षी ते प्रथम मुख्यमंत्री बनले. २०२२मध्ये विधानसभा निवडणूक लढवणारा वयोवृद्ध राजकारणी असा लौकिक त्यांचाच. वयाच्या ९४ व्या वर्षी लांबी या आपल्या पारंपरिक मतदारसंघातून १३व्यांदा विधानसभा निवडणूक लढवली. मात्र आम आदमी पक्षाच्या लाटेत त्यांचा पराभव झाला. विक्रमी पाच वेळा त्यांनी पंजाबचे मुख्यमंत्रिपद भूषवले. सतत जनतेत राहणारा राजकारणी अशी त्यांची ओळख. मात्र कुटुंबातील व्यक्तींना पुढे आणण्याच्या प्रयत्नात घराणेशाहीचा अकाली दलाला फटका बसला. कारकिर्दीच्या अखेरीस पंजाबमध्ये त्यांच्या पक्षाची स्थिती बिकट झाली. २०२२च्या पंजाब विधानसभा निवडणुकीत अकाली दलाचा दारुण पराभव झाला. २०१५ मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने त्यांना गौरवण्यात आले. कृषी कायदे आणल्याच्या निषेधार्थ त्यांनी २०२० मध्ये हा पुरस्कार परत केला. साधेपणा, विचारांशी निष्ठा ही प्रकाशसिंग बादल यांची वैशिष्ट्ये. राजकारणात क्षणिक लाभासाठी भडक विधाने सुरू असतात. बादल यांनी मात्र हा मार्ग कधी अनुसरला नाही. घटनेच्या चौकटीत राजकारण करून पंजाबमध्ये ८० च्या दशकात बिकट कालखंडात शीख-हिंदू ऐक्य कायम टिकावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांनी स्वातंत्र्यपूर्व चळवळ अनुभवली होती.स्वातंत्र्यानंतर पाकिस्तानने पंजाबात अशांतता माजवली. काँग्रेसची धोरणे बादल यांना पटली नाहीत. त्यातूनच त्यांनी शिरोमणी अकाली दल स्थापन केला.त्यांनी पुन्हा कधीही काँग्रेसशी वाट धरली नाही. भाजपशी युती असताना मतभेद झाले पण ते मिटवण्यात बादल यांचा मोठा वाटा होता. बादल यांच्या निधनाने स्वातंत्र्योत्तर काळात सुरुवातीपासून समाजहिताचे राजकारण करणाऱ्या एका युगाचा अंत झाला आहे.

राजकीय

# 'बीआरएस' मुसंडी मारणार का?

**भारत राष्ट्र समिती (बीआरएस) पक्षाने मराठवाडामार्गे महाराष्ट्रात पाय रोवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. 'बीआरएस'ची २४ एप्रिल रोजी मराठवाड्यातील तिसरी सभा आहे. हा पर्याय महाराष्ट्रात कितपत स्वीकारला जाईल, याबाबत आताच भाकीत करणे घाईचे ठरणार आहे.**

वेगळ्या तेलंगण राज्याच्या निर्मितीसाठी महत्त्वाची भूमिका बजावलेले के. चंद्रशेखर राव ऊर्फ केसीआर यांनी सलग दुसऱ्यांदा तेलंगणचे मुख्यमंत्रिपद सांभाळले आहे. राज्याच्या निर्मितीनंतर विविध घटकांसाठी प्रभावी योजना राबवल्या. तेलंगणमध्ये विजेचा प्रश्न मिटवल्याचा दावा करून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. शेतीसाठी मुबलक पाणी, वीज, धान्याला हमीभाव, भातशेतीत जगात अव्वल, आशिया खंडात सर्वांत मोठी क्षमता असलेला सिंचन प्रकल्प असे अनेक नावीन्यपूर्ण प्रकल्प यशस्वीपणे राबविल्याचे सांगणाऱ्या जाहिराती विविध माध्यमांतून प्रदर्शित होत आहेत.

**राष्ट्रीय पक्ष बनण्याची मनीषा**

अब की बार, किसान सरकार' अशी घोषणा देऊन पक्षाची राष्ट्रीय पातळीवर ओळख निर्माण करण्यासाठी केसीआर यांनी तेलंगण राष्ट्र समितीऐवजी भारत राष्ट्र समिती (बीआरएस) असा बदल पक्षाच्या नावात केला आणि तेलंगणबाहेर पक्षविस्ताराचे मनसुबे जाहीर केले. सन २०१४पासून तेलंगणमध्ये सत्तेत असलेले चंद्रशेखर राव यांनी महाराष्ट्रात पक्षविस्ताराची मोहीम नांदेडमधून सुरू केली. हैदराबादच्या ऑल इंडिया मजलीस ए इत्तेहादुल मुस्लिमिन (एआयएमआयएम) पक्षाने २०१४मध्ये महाराष्ट्रात नांदेडमार्गेच प्रवेश केला. पुढे उदगीर, छत्रपती संभाजीनगरमध्ये बस्तान बसवले. त्या धर्तीवर 'बीआरएस'नेही नांदेडमार्गे मराठवाड्यात प्रवेश केला. काही महिन्यांपूर्वी कर्नाटक सीमेवरील काही गावांनी महाराष्ट्रातून कर्नाटकात जाण्याची इच्छा जाहीर केली. त्या पाठोपाठ नांदेड जिल्ह्यातील काही गावांनी तेलंगणमध्ये विलीन होण्याची इच्छा व्यक्त केली. या हालचालींनंतर केसीआर यांनी पक्षविस्ताराच्या मोहिमेला जोर देण्याचे ठरवले. नांदेड जिल्ह्याच्या किनवट, बिलोली, धर्माबाद, देगलूर, मुखेड आदी तालुक्यांमध्ये 'बीआरएस'च्या लोकप्रतिनिधींनी संपर्क वाढवला. देशातील सहा लाख गावांमध्ये 'बीआरएस'चे जाळे पसरविण्याचा मनोदय केसीआर यांनी पूर्वीच व्यक्त केला आहे. त्यानुसार नांदेड, यवतमाळ, लातूर जिल्ह्यातील गावांमध्ये 'बीआरएस'ने पक्षविस्ताराच्या दृष्टीने मोहीम राबविणे सुरू केले. नांदेड, कंधार या दोन ठिकाणी झालेल्या सभांना मोठी गर्दी झाली; पण त्यातील बहुतांश लोक तेलंगणमधून आणले होते, असे स्थानिक सांगतात. माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे यांच्या 'बीआरएस' प्रवेशानंतर कंधारमध्ये सभा झाली. गेल्या दोन महिन्यांत परभणी, छत्रपती संभाजीनगरमधून विविध पक्षांतील नेते 'बीआरएस'मध्ये प्रवेश करीत आहेत. यापैकी अनेकांची पक्षबदलाची तिसरी, चौथी वेळ आहे.

**कार्यकर्त्यांचा अभाव**



बीआरएस'ला भविष्यात राष्ट्रीय पक्षाचा दर्जा प्राप्त करून घेण्यासाठी राज्याबाहेरील उमेदवारांना अपेक्षित मते जमवावी लागणार आहेत. त्यासाठी ठरावीक मतदारसंघांमध्ये मतकोट्यापर्यंत पोचण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांना शोधून त्यांना पक्षात घेण्यासाठी 'बीआरएस'ने स्वतंत्र यंत्रणा महाराष्ट्रात कार्यरत केल्याचे राजकीय वर्तुळात सांगितले जात आहे. लोकसभा निवडणुकीला अजून वर्षभर कालावधी आहे. विधानसभा निवडणुकांना दीड वर्षे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत अनिश्चितता आहे. अशा परिस्थितीत 'बीआरएस' मराठवाड्यात पाय रोवू पाहत आहे. मात्र, हे तितके सोपे नाही. बीआरएस'कडे कार्यकर्त्यांची मोठी फळी नाही. नेते असले तरी कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण करण्याचे मोठे आव्हान आहे. दुसरीकडे पक्षचिन्हाची ओळख मतदारापर्यंत कशी पोहोचवायची? मुळातच हा पक्ष महाराष्ट्राबाहेरचा आहे. त्यांना मराठवाड्यामार्गे बस्तान बसवण्यासाठी प्रचंड मेहनत घ्यावी लागणार आहे. यात भाषेचा अडसर असेलच. त्यासोबत बाभळी प्रकल्पाच्या पाणीवाटपाचा वाद बीआरएस'ची सर्वांत मोठी डोकेदुखी आहे. बाभळी बंधाऱ्याच्या पाणीवाटपावरून महाराष्ट्र व तेलंगणमध्ये वाद आहे. या मुद्द्यावर तेलंगणमधील मंडळी दावा करतात की हा प्रश्न दोन मिनिटांत मिटेल. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी त्यासाठी आमच्या मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावी. आम्ही महाराष्ट्र सरकारला स्मरणपत्रेही दिली आहेत. त्यांच्या या दाव्यात किती तथ्य आहे हे दोन्ही सरकारांचे अधिकारी, सत्ताधारी जाणोत; पण या गंभीर मुद्द्यावर महाराष्ट्र सरकारनेही आपली भूमिका लवकर स्पष्ट करणे आवश्यक आहे. तेलंगणमध्ये शेतकरी हिताच्या अनेक योजना 'बीआरएस'ने राबविल्या. पण त्याची माहिती महाराष्ट्रातील नागरिकांपर्यंत म्हणावी तेवढी पोचलेली नाही. तेलंगणमध्ये केलेली कामे लोकांपर्यंत जोवर जात नाहीत, तोपर्यंत 'बीआरएस'ला मराठवाडा, महाराष्ट्रात पाय रोवता येणार नाही. केवळ स्थानिक मतदारसंघांतील नेत्यांना सोबत घेऊन मते पारड्यात पडतील, असे नाही. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण करावे लागणार आहे. पक्षसंघटन मजबूत केले, कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण केले; तर आगामी काळात 'बीआरएस'ला आशेचा किरण दिसू शकेल. एमआयएम'ला मराठवाडा, महाराष्ट्रात मिळालेले यश बीआरएस'च्या वाट्याला येण्यासाठी अनेक गोष्टींचा अडथळा आहे. नुसत्या सभा घेऊन वातावरणनिर्मिती करण्याचा प्रयत्न 'बीआरएस'ला आगामी निवडणुकीत यश मिळवून देणार काय हा प्रश्न कायम आहे. 'एमआयएम'ला नांदेड महापालिका किंवा छत्रपती संभाजीनगर महापालिका आणि नंतर लोकसभा निवडणुकीत फायदा झाला. तशी पक्की किंवा हमखास अशी व्होटबँक 'बीआरएस'कडे नाही. त्यातही महाराष्ट्रातील सततचे राजकीय अस्थैर्य, शिवसेनेतील फूट, महाविकास आघाडीत चाललेल्या कुरघोडीच्या खेळी आणि शिवसेना शिंदे- भाजप सरकारवरील सर्वोच्च न्यायालयातील निकालाची टांगती तलवार या सर्व बाबी महाराष्ट्राच्या राजकारणावर दीर्घकाळ परिणाम करणारे घटक आहेत. त्यामुळे तेलंगणमधून गाड्यांचा ताफा आणून, भपकेबाजपणा करून किंवा पैशाचा डामडौल दाखवून सभांतून शक्तिप्रदर्शन करणे आणि वातावरणनिर्मिती करणे या पलीकडे 'बीआरएस' कसे पोहोचणार हे येणारा काळच दाखवून देईल.

**पुढील मोर्चा सोलापूरकडे**


संमिश्र संस्कृतीच्या सोलापूर शहरात तेलुगू भाषकांची संख्या पाच लाखांच्या घरात आहे. त्यामुळे साहजिकच, केसीआर यांनी मराठवाड्यानंतर सोलापूरकडे मोर्चा वळवला आहे. काँग्रेसचे माजी खासदार ८१ वर्षीय धर्मण्णा सादूल यांनी 'बीआरएस'मध्ये प्रवेश करणार असल्याचे नुकतेच पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले आहे. सोलापूरमध्ये अनेक नागरिक तेलुगू भाषिक असले आणि सादूल यांनी प्रवेश केला म्हणजे तेलुगू भाषकांची मते 'बीआरएस'ला मिळतीलच असे म्हणता येणार नाही. मते खेचून घेणारे आश्वासक चेहरे 'बीआरएस'च्या गळाला लागतील, यासाठी त्यांना प्रचंड मेहनत घ्यावी लागणार आहे. काही नेत्यांचा पक्षप्रवेश घडवून केसीआर यांना वातावरणनिर्मिती करता येईल, मात्र त्याचा पक्षवाढीसाठी फारसा उपयोग होईल की नाही, या पुढे दिसून येईल. 'एमआयएम'ने सोलापुरातही बऱ्यापैकी बस्तान बसवले आहे. या पक्षाचे काही नगरसेवकही निवडून आले होते. सोलापूर मध्य विधानसभा मतदारसंघात 'एमआयएम'च्या उमेदवाराने गेल्या निवडणुकीत निकराची झुंज दिली होती. असे यश 'बीआरएस'च्या टप्प्यात दिसत नाही. 'एमआयएम' आणि 'बीआरएस'च्या मतदारांमध्ये फरक आहे, हे यामागील महत्त्वाचे कारण आहे. मराठवाडा तेलंगणला चिकटून आहे आणि सोलापुरात तेलुगू भाषकांची संख्या मोठी आहे. तेलंगणला लागून असलेल्या दोन भागांमध्ये असे चित्र असेल, तर उर्वरित महाराष्ट्रात कोणत्या आधारावर 'बीआरएस' पाय रोवण्याचे प्रयत्न करणार याचे उत्तर मिळण्यासाठी निवडणुकांची वाट पाहावी लागणार आहे.

**- मकरंद कुलकर्णी.**

टुडेज् ब्लॉग

# समलैंगिक विवाह : सुनियोजित षड्यंत्र

**भा. दं. वि. कलम ३७७ हटवल्यावर भारतात समलैंगिकतेला कायदेशीर मान्यता मिळाल्यानंतर आता समलैंगिक विवाहाला कायदेशीर मान्यता देण्याच्या याचिका दाखल झाल्या आहेत. या याचिकांची नियमित सुनावणी होऊन त्या आता सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापिठाकडे वर्ग करण्यात आल्या आहेत. एका सुनियोजित षड्यंत्राद्वारे समलैंगिक विवाहाला कायदेशीर मान्यता देण्याचा प्रयत्न चालू आहे. एरवी नियमित खटले, प्रलंबित निकाल देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडे वेळ नाही; मात्र समलैंगिकता विषयासाठी न्यायालयाकडे वेळ आहे. कुठले तरी चुकीचे कायदे आणून पती-पत्नीच्या पवित्र विवाहबंधनाला धोका निर्माण केला जात आहे. समलैंगिक विवाहाला मान्यता देऊन या देशाची आणखी अधोगतीकडे वाटचाल चालू होईल याचा सरकार आणि समाज यांनी गांभीर्यपूर्वक विचार करावा, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे ज्येष्ठ अधिवक्ते सुभाष झा यांनी केले. हिंदू जनजागृती समिती आयोजित समलैंगिकतेला सर्वोच्च न्यायालयात एवढे महत्त्व का?' या ऑनलाईन 'विशेष संवादा'त ते बोलत होते.**




अधिवक्ता झा पुढे म्हणाले की, मुळात समलैंगिकता हा चर्चेचा विषय असूच शकत नाही; कारण समलैंगिकता हा समाजातील काही वर्गाला ग्रासलेला रोग आहे. ज्याप्रमाणे कोरोनासाठी सरकारने लस आणली, त्याप्रमाणे या रोगाने ग्रासलेल्यांना इलाजाची आवश्यकता आहे. उद्या देशातील लाखो चोरांनी चोरी करणे, हा आमचा घटनात्मक अधिकार आहे' असे म्हटले, तर तो त्यांचा घटनात्मक अधिकार होऊ शकत नाही. तसेच समलैंगिकतेविषयी आहे. समलैंगिकतेच्या समर्थनार्थ याचिका न्यायालयात दाखल करणारे कोण आहेत? याचा सरकारने शोध घ्यायला हवा.

इतिहास अभ्यासक मीनाक्षी शरण म्हणाल्या की, 'समलैंगिकता ही रोम आणि ग्रीस देशांकडून आलेली विकृती आहे. यातूनच एड्स रोगाची उत्पत्ती झाली आहे. समलैंगिकतेला मान्यता देऊन पवित्र विवाहसंस्था आणि कुटुंबव्यवस्था यांवर चौफेर आघात केले जात आहेत. हिंदू धर्मात विवाहाच्या वेळी पुरुष आणि स्त्री यांच्या मीलनाला शिव-शक्तींचे मीलन मानले गेले आहे. धर्मात जी चार ऋणे सांगितली आहेत, त्यातील पितृ ऋण फेडण्यासाठी संततीची आवश्यकता असते. ते केवळ विवाहाच्या माध्यमातूनच साध्य होऊ शकते. धर्माचे योग्य पालन होऊ शकते. सध्याच्या भरकटलेल्या युवा पिढीला समलैंगिकतेच्या माध्यमातून दिशाहीन करण्याचा प्रयत्न केला जात आहे. समाजाने या अनैसर्गिक आणि चुकीच्या गोष्टींविरोधात लढा देण्याची आवश्यकता आहे, असेही शरण म्हणाल्या.'

**- रमेश शिंदे,**
**राष्ट्रीय प्रवक्ता, हिंदू जनजागृती समिती.**

जन्म हा अखेरचा

## कायानुग्रहस्थल - ३



म्हणून संतसंग हे संसारातील एक अमूल्य रत्न आहे.

दुसरे रत्न आहे 'हरिभजन'. संतांकडे गेल्यावर ते आपल्याला भगवद्भक्तीचा मार्ग दाखवतात. वाल्मीकीला तेव्हा नारदाची संगत लाभली तेव्हा त्यांनी त्याला नामजपाचा उपदेश केला. आपल्या इष्टदेवतेचे भजन करणे म्हणजे तिच्या प्रतिमेची पूजा करणे, तिच्या नामाचा जप करणे, तिच्या निराकार रुपाचे चिंतन करणे, शरीर, वाणी आणि मन या त्रिकरणांनी भगवंताची सेवा करणे म्हणजे हरिभजन होय. 'दया' हे तिसरे रत्न आहे. तुम्ही हरिभजन करता, सत्संग करता, परंतु जर तुम्हाला दीनदुबळ्यांची दया येत नसेल तर तुमचे भजन, तुमचा सत्संग व्यर्थ आहे. देवघरात देवाची मनोभावे पूजा करणाऱ्या मनुष्याने दारात आलेल्या भिकाऱ्याला वाक्तडन केले, हाकलून दिले तर त्याच्या पुजेला काय अर्थ आहे? दया हा एक श्रेष्ठ धर्म आहे. प्राणिमात्राविषयी दयाभावना ठेवली पाहिजे. दया करणे म्हणजे दुसऱ्याला सुख देणे. जो दुसऱ्याला सुख देऊ शकत नाही तो स्वत: सुखी होऊ शकत नाही. दयेमुळे दया करणारा आणि ज्याच्यावर दया केली जाते तो असे दोघेही सुखी होतात. म्हणून दया हे तिसरे सुखरत्न होय.

चौथे सुखरत्न आहे 'धर्म'. धर्म म्हणजे उत्तम आचरण. सत्य बोलणे, हिंसा न करणे, इष्टदेवतेची पूजा करणे, गुरुमंत्राचा जप करणे, ध्यान करणे, दान करणे हे सारे धर्म होत. धर्माचे दहा प्रकार सांगितले आहेत. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, दया, क्षमा, दान, पूजा, जप आणि ध्यान. या धर्माचरणामुळे पुण्यप्राप्ती होते आणि पुण्यप्राप्तीमुळे सुखलाभ होते. आपल्याला सुखी व्हायचे असते, परंतु ज्यामुळे सुखप्राप्ती होते ते धर्माचरण मात्र नको असते.

पुण्यस्य फलमिच्छन्ति पुण्यं नेच्छन्ति मानवा: ।

पुण्याचे फळ सर्वांना हवे असते पण, पुण्य करणे, कोणालाच नको असते. दान करा, ध्यान करा, जप करा असे सांगितले तर त्याचे एकच उत्तर असते. 'नाही' सुख असे थोडेच मिळते? चांगले काम केले तर पगार मिळतो, वाईट केले तर मिळत नाही. इहलोकात जे घडते तेच परमार्थजगात घडत असते. पुण्य कराल तर सुख मिळेल, अन्यथा नाही. याच्या उलट आणखी एक गोष्ट आहे.

पापस्य फलं नेच्छन्ति पापं कुर्वन्ति यत्नत: । पापाचे फळ दु:ख हे आहे. दु:ख कोणाला नको असते, परंतु पाप मात्र यत्नपूर्वक करतात. शास्त्रनिषिद्ध कर्मामुळे मनुष्य पापात्मा होऊन दु:ख भोगतो.

**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

## थोर शास्त्रज्ञ डॉ. शंकर आबाजी भिसे

स्वातंत्र्यपूर्व काळातील एक थोर संशोधक डॉ शंकर आबाजी भिसे यांचा जन्म २९ एप्रिल १८६७ रोजी मुंबईत झाला. म्हणजे आज २९ एप्रिल २०२० रोजी त्यांचे १५६वे जयंतीवर्ष. या जयंतीचा विसर पडणाऱ्यांचीच संख्या अधिक असेल. ज्या काळात भारतीय नागरिकांना कमी लेखले जात होते त्या काळात डॉ. भिसे यांनी संशोधन क्षेत्रात अजोड कार्य केले. लहानपणापासून संशोधनाची आवड असणाऱ्या डॉ. भिसे यांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी दगडी कोळश्यापासून गॅस शुद्ध करण्याचे पेटंट मिळवले. १८९७ मध्ये त्यांनी शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी सायंटिफिक क्लबची स्थापना केली. पुढील वर्षी त्यांनी याच क्लबतर्फे विविध कलासंग्रह नावाचे मासिक सुरू केले. त्यांनी तयार केलेल्या वजन मापन यंत्राच्या आराखड्याला इंग्लंडमध्ये पहिले बक्षीस मिळाले. विशेष म्हणजे या स्पर्धेत युरोप आणि अमेरिकेतील नामांकित संशोधक सहभागी झाले होते. सण १९०० मध्ये त्यांनी मुद्रणव्यवसायातील यंत्र सामग्रीचा अभ्यास केला व लायनो, मोनो इत्यादी यंत्राच्या रचना व कालमर्यादा यांचा अभ्यास करुन त्यांनी भिसे टाईप या यंत्राचा शोध लावला व त्याचे युरोपीय देश व अमेरिकेमध्ये पेटंट प्राप्त केले. या यंत्राच्या उत्पादनासाठी त्यांनी सर द टाटा- भिसे इन्व्हेन्शन सिंडिकेटची लंडन येथे स्थापना केली. इंग्लंडमध्ये गेल्यावर त्यांनी छपाईच्या क्षेत्रात अनेक शोध लावले. त्यांनी गुणिका मातृका नावाचे दर मिनिटास १ हजार २०० विविध प्रकारचे खिळे पडणारे यंत्र १९१४ मध्ये तयार केले, १९१६ मध्ये विक्रीसही काढले. त्याचवर्षी ते अमेरिकेत गेले व तिथे त्यांनी युनिव्हर्सल टाईप मशीन या कंपनीच्या विनंतीनुसार आयडियल टाईप कास्टर हे यंत्र शोधून काढले व त्यांचे पेटंटही मिळवले. १९२१ मध्ये त्यांनी हे यंत्र विक्रीस काढले. १९१७ मध्ये त्यांनी शेला नावाचे कपडे धुण्यासाठी वापरता येईल अशी डिटर्जंट पावडर तयार केली व त्याच्या निर्मितीचे हक्क एका ब्रिटिश कंपनीला दिले. त्यांनी शोध लावलेल्या ऑटोमेडियन या गुणकारी औषधामुळे पहिल्या महायुद्धात अनेक सैनिकांचे प्राण वाचले. डॉ भिसे यांच्या मानवतावादी भूमिकेमुळे त्यावेळी अनेकांचे प्राण वाचले. डॉ भिसे यांनी सुमारे २०० शोध लावले. त्यांचे कार्य सर्वांसाठी कायम प्रेरणादायी आहे. अमेरिकेत न्यूयॉर्क येथे ७ एप्रिल १९३५ रोजी या महान संशोधकांचे निधन झाले. संशोधन क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे. शासनाने त्यांच्या या महान कार्याची दखल घेऊन त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करावा.

**- श्याम ठाणेदार, दौंड.**

शेतमाल तारण कर्ज योजना

# शेतकऱ्यांना वरदान

**राज्यात कृषी पणन व्यवस्थेत अद्ययावतपणा बरोबरच सुसूत्रता आणि समन्वयता आणण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ अत्यंत महत्त्वपूर्ण काम करत आहे. कृषी पणन मंडळ पणन व्यवस्थेत आधुनिकीकरण, सुधारणा आणण्याबरोबरच राज्यात कृषी पणन व्यवस्था मजबूत करण्यासाठी विविध प्रकल्प, योजना राबविणे, नवीन कार्यक्रम आखणे तसेच शेतकरी आणि शेतकऱ्यांच्या संस्थांच्या विकासासाठी पणन मंडळ प्रयत्न करत आहे.**

राज्यात कृषी मालाच्या निर्यातीसाठी निर्यात सुविधा केंद्रांची स्थापना करून ही केंद्रे सक्षमपणे चालवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. कृषी पणन मंडळामार्फत शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध योजना राबविल्या जातात. त्यापैकीच एक म्हणजे शेतमाल तारण कर्ज योजना. याविषयीची माहिती....


उतरत्या बाजारभावामुळे शेतमालाचे काढणी हंगामात होणारे आर्थिक नुकसान टाळून राज्यातील शेतकऱ्यांना सुलभ कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ १९९० पासून राज्यातील बाजार समित्यांच्या माध्यमातून शेतमाल तारण कर्ज योजना राबवीत आहे. शेतमालाचे काढणी हंगामात शेतकऱ्यांस असलेली आर्थिक निकड विचारात घेऊन या गरजेच्या वेळी आर्थिक सहाय उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**योजनेची ठळक वैशिष्ट्ये**

या योजनेमध्ये तूर, मूग, उडीद, सोयाबीन, सूर्यफूल, हरभरा, धान, करडई, ज्वारी, बाजरी, गहू, मका, बेदाणा, काजू बी, हळद, सुपारी व राजमा या शेतमालाचा समावेश आहे. शेतकऱ्यांना बाजार समितीच्या गोदामात तारणात ठेवलेल्या शेतमालाच्या एकूण किमतीच्या ७५ टक्क्यांपर्यंत ६ टक्के व्याजदराने ६ महिने कालावधीसाठी कर्ज त्वरित उपलब्ध करून दिले जाते. बाजार समितीच्या गोदामात ठेवलेल्या शेतकऱ्यांच्या शेतमालासाठी गोदाम भाडे, विमा, देखरेख खर्च इत्यादी खर्चाची जबाबदारी बाजार समितीवर असल्याने शेतकऱ्यांना त्याचा भुर्दंड नाही.

**व्याजात सवलत**

सहा महिन्याच्या आत कर्ज परतफेड करणाऱ्या बाजार समित्यांना ३ टक्के व्याज सवलत देण्यात येते. स्वनिधीतून तारण कर्ज राबविणाऱ्या बाजार समित्यांनी वाटप केलेल्या तारण कर्ज रकमेवर ३ टक्के व्याज सवलत देण्यात येते. योजना राबविण्यासाठी स्वनिधी नसलेल्या बाजार समित्यांना पणन मंडळाकडून ५ लाख रुपये अग्रिम उपलब्ध करून दिला जातो. राज्य वखार महामंडळाच्या गोदामातील शेतकऱ्यांच्या मालाच्या वखार पावतीवर तारण कर्ज उपलब्ध करून दिले जाते.



**तारण कर्जाची मुदत व व्याजदर**

शेतमालाच्या प्रकारानुसार राजम्यासाठी बाजारभावाच्या ७५ टक्के अथवा प्रति क्विंटल रुपये ३ हजार यापैकी कमी असणारी रक्कम ६ महिने मुदतीसाठी ६ टक्के व्याजदराने देण्यात येते. तर काजू बी व सुपारीसाठी बाजार भावानुसार एकूण किमतीच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त १०० रुपये प्रति किलो यापैकी कमी असणारी रक्कम ६ महिने मुदतीसाठी ६ टक्के व्याजदराने देण्यात येते. बेदाणा पिकासाठी एकूण किंमतीच्या कमाल ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त ७ हजार ५०० प्रति क्विंटल यातील कमी असणारी रक्कम ६ महिने मुदतीसाठी ६ टक्के व्याजदराने देण्यात येते. कृषी पणन मंडळामार्फत २०२२-२३ यावर्षीच्या हंगामात राज्यातील ६१ बाजार समित्यांनी ३ हजार २६९ शेतकऱ्यांचा १ लाख ४७ हजार २९३ क्विंटल शेतमाल तारणात स्वीकारून त्यांना एकूण ३९ कोटी ९८ लाख इतक्या रकमेचे तारण कर्ज वितरित करण्यात आले आहे. बाजार समित्या व शेतकऱ्यांकडून योजनेस चांगला प्रतिसाद मिळत असून शेतमाल तारण कर्ज योजना ही राज्यातील धान्य उत्पादक शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरत आहे. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या www.msamb.com या संकेतस्थळास भेट द्यावी.

**- संकलन : विभागीय माहिती कार्यालय, पुणे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## ऑर्किड अभियांत्रिकी व पॉलिटेक नॅन्सी फ्रान्समध्ये सामंजस्य करार

**सोलापूर :** एन.के. ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर व पॉलिटेक नॅन्सी फ्रान्स यांच्यामध्ये नुकतेच आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार करण्याचे ठरले. सोलापुरातील कुठल्याही अभियांत्रिकी महाविद्यालयाने परदेशी विद्यापीठाबरोबर सामंजस्य करार करण्याची ही पहिलीच वेळ आहे. या सामंजस्य कराराचा भाग म्हणून प्रथमदर्शी पॉलिटेक नॅन्सी फ्रान्सचे तीन विद्यार्थी हे ऑर्किड अभियांत्रिकीत ला फाऊंडेशन डेसॉल्ट सिस्टम प्रायोजित सोलार रिसर्च सेंटरमध्ये तीन महिन्याची इंटर्नशीप करण्यासाठी दाखल झाले आहेत. या इंटर्नशीपच्या माध्यमातून फ्रान्सच्या विद्यार्थ्यांना सोलारचे वेगवेगळे प्रॉडक्ट व प्रोजेक्ट तयार करण्याचा अनुभव मिळणार आहे, अशी माहिती ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. बी. दफेदार यांनी दिली. पॉलिटेक नॅन्सी ही फ्रान्समधील बारा अभियांत्रिकी मिळून असलेल्या लोरेन ह्या विद्यापीठाचा भाग आहे. लोरेन विद्यापीठात सात हजार प्राध्यापक कार्यरत असून पन्नास हजार विद्यार्थी अभियांत्रिकीबरोबरच इतर शाखांमध्ये उच्च शिक्षण घेत आहेत. या विद्यापीठामध्ये उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय इंटर्नशीप बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाची ओळख होते. या सामांजस्य कराराच्या औपचारिक चर्चेसाठी पॉलिटेक नॅन्सीचे प्राध्यापक डॉ. तारक बेन जिनब तसेच पॉलिटेक नॅन्सीचे आंतरराष्ट्रीय संबंध समन्वयक कॅरोलीन गेहीन यांनी ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयास एप्रिल २५ व २६ या दोन दिवस भेट दिली. तसेच त्यांनी ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयात सुरू असलेल्या प्रॉडक्ट डेव्हलपमेंट व प्रोजेक्टची प्रशंसा केली. पॉलिटेक नॅन्सी फ्रान्स व ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये सामंजस्य करारासाठी ला फाऊंडेशन डेसॉल्ट सिस्टमसचे हेमंत गाडगीळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच या सामंजस्य करार करण्यासाठी ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे आंतरराष्ट्रीय सामंजस्य समन्वयक डॉ. श्रीनिवास मेतन व त्यांच्या सहकार्यांनी अथक परिश्रम घेतले. सोलापुरातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय एक्सपोजर मिळत असल्यामुळे ऑर्किडच्या सर्व विद्यार्थी व पालकांमध्ये अतिशय आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ऑर्किडच्या या अद्विितीय उपक्रमासाठी संस्थेचे सर्व विश्वस्तांनी प्राध्यापक व स्टाफ यांचे अभिनंदन केले.

## अकलूज कृषी उत्पन्न बाजार समिती; ९६.६५ टक्के मतदान

**अकलूज :** अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी शुक्रवार दि २८ एप्रिल रोजी झालेल्या मतदानात ९६.६५% एवढे विक्रमी मतदान झाले असून मतमोजणी आज शनिवार दि २९ एप्रिल रोजी सकाळी ८.०० वाजता सुरू होणार आहे अकलूज कृषी उत्पन्न बाजार समिती साठी सोसायटी मतदारसंघातून एकूण १८२२ ग्रामपंचायत ११५१ व्यापारी ४११ हमाल तोलार २०३ असे एकूण ३५८७ एवढे मतदान होते यापैकी सोसायटी मतदारसंघातून १८२२ पैकी १७७८, ग्रामपंचायत विभागातून ११५१ पैकी ११३२, व्यापारी विभागातून ४११ पैकी ३६९, हमाल तोलार विभागातून २०३ पैकी १८८ असे ३५८७ पैकी ३४६७ एवढे मतदान झाले असून याची टक्केवारी ९६.६५% इतकी आहे.अकलूज कृषी उत्पन्न बाजार समिती साठी शनिवार दि २९ एप्रिल रोजी सकाळी ८.०० वा मतमोजणी सुरू होणार असून ही मतमोजणी एकूण १० टेबलवर होणार आहे सर्वप्रथम सोसायटी मतदार संघातील मतमोजणी होणार आहे यानंतर ग्रामपंचायत मतदार विभागातील मतमोजणी होणार असून सर्वात शेवटी व्यापारी व हमाल तोलार या विभागातील मतमोजणी होणार असून सकाळी ८.०० वाजता सुरू होणारी मतमोजणी अंदाजे दुपारी २.०० वा पर्यंत संपेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मतदारांनी कुणाला कौल दिला आहे याची उत्सुकता शीगेला पोहोचले आहे.

## न्यायालयीन लढाईच्या तयारीसाठी लक्ष्मी-विष्णू मिल कामगारांची बैठक

**सोलापूर :** लक्ष्मी - विष्णू मिल कामगारांच्या देय रकमा मिळाव्यात यासाठी ३२९ कामगारांचा हायकोर्टात दावा दाखल करण्यात आला होता. या केसेस चालविण्यासाठी सर्व कामगारांची बैठक सोमवार दि. १ मे रोजी सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी हायस्कूल प्रभात टॉकीज शेजारील सभागृहात आयोजित करण्यात आली असल्याची माहिती ह. भ. प. लक्ष्मण महाराज चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली. कै. बसवंती यांच्याकडून मिल कामगारांच्या देय रकमा मिळाव्यात यासाठी ३२९ कामगारांचा हायकोर्टात दावा दाखल करण्यात आला होता. या केसेस चालविण्यासाठी सर्व कामगारांची बैठक घेण्यात येणार आहे. कोरोनामुळे कोर्ट कार्यवाही अर्थात कामकाज थांबले होते. आता परत ती कार्यवाही सुरू होत आहे. या कामकाजामध्ये लक्ष्मी - विष्णू मिल लिक्विडेटरकडून परवानगी न घेता बंद केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे मिलच्या जागेची विक्री व्यवहार सर्व बेकायदेशीर झाले असे सिद्ध होत आहे. त्यामुळे उच्च न्यायालय या गंभीर गुन्ह्याकडे लक्ष देऊन कामगारांची देणे देण्यास भाग पाडू शकतील अशी खात्री असल्याचे भुसारे यांनी सांगितले. या बैठकीस हायकोर्टाचे प्रख्यात वकील देशपांडे, देशमुख हजर राहणार असून कामगारांना मार्गदर्शन करणार आहेत. तेव्हा जास्तीत जास्त कामगारांनी या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन शहराध्यक्ष शशिकांत भुसारे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस रमेश गायकवाड, शामराव नरोळे, गणेश गायकवाड, हारून पठाण, तानाजी कदम, विश्वंभर मोरे आदी उपस्थित होते.

## ड्रीम फाउंडेशन तर्फे कोन्हाळी येथे निवासी उन्हाळी शिबिराचे आयोजन

**सोलापूर :** ड्रीम फाउंडेशनच्या वतीने कोन्हाळी जवळील श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम केंद्रात दि. २ ते ४ मे दरम्यान निवासी उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संयोजक काशिनाथ भतगुणकी यांनी पत्रकार परिषदेत दिली. ड्रीम फाउंडेशन तर्फे १९ वर्षापासून उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात येते. यामध्ये उषाताई हंचाटे, शिवशरण आचलारे, अमोल तळेकर, ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी, नकलाकार अंबादास कणकट्टी, कॅप्टन आशा शिंदे, राजश्री थळगे, पत्रकार मारुती बावडे, शिवानंद गोगाव, शाहीर रमेश खाडे यांच्यासह विविध मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या शिबिरात भाग घेण्यासाठी ८ ते १४ वयोगटातील मुलांनी नोंदणी करावी. प्रवेशासाठी पालकांनी संगीता पाटील (८४ ८४ ९५ २० २०) सतीश पाटील (७२ १९ ०९ ९९ ५५) यांच्याकडे नाव नोंदणी करावी, असे आवाहन काशिनाथ भतगुणकी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेत रमेश खाडे उपस्थित होते.

# आंतरराज्य घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीचा पर्दाफाश

## दोन टोळ्यांकडून नऊशे ग्राम सोने व दीड किलो चांदीचे जप्त

**सुराज्य/सोलापूर**

दिवसा ढवळ्या जिल्ह्यातील बार्शीसह राज्यभरात चोरी करणाऱ्या इंदोर येथील टोळी व एका स्थानिक टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. दोन्ही टोळी कडून नऊशे ग्राम सोने व दीड किलो चांदीचे जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या प्रकरणी एकूण पाच जणांना अटक करण्यात आली आहे.



एका गुन्ह्यात पोलिसांनी पवन ऊर्फ भुरा रामदास आर्य (वय ३८, रा. इंदौर), मनोजकुमार ऊर्फ राहुल ठाकुरदास आर्य ( वय ३२, रा. ग्वालियर, मध्यप्रदेश), दिप्रेंद्रसिंग ऊर्फ चिंटू विजयसिंग राठोड ( वय ४१), देवेंद्र ऊर्फ रामलाला गुर्जर (वय ३७, रा. इंदौर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींचे नाव आहेत. त्यांच्याकडून एकूण ७५२ ग्रॅम सोने, १५७९ ग्रॅम वजनाचे चांदीचे ३ ताट, रोख चार लाख रूपये व कार असे एकूण ५४ लाख ५४ हजार ६५६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींकडून एकून सात गुन्हे उघडकीस आले आहेत. तर दुसर्या गुन्ह्यात जिल्ह्यात ५ घरफोडी केल्याप्रकरणी अनिल श्रीमंत पवार (रा. पानमंगळूर, ता. अक्कलकोट) यांना अटक केली असून त्याच्याकडून ५ लाख ३४ हजारांचे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात एकूण आरोपीने १३ घरफोडी व एक मोटारसायकल चोरी केल्याचे कबूल केले आहे.

दरम्यान, बार्शी मधील सुभाष नगरात ६ एप्रिल रोजी दिवसा ढवळ्या आरोपींनी एक घर फोडून घरातील ७ लाख ८९ हजारांचे मुद्देमाल चोरी केली होती. याप्रकरणी तपा करताना पोलिसांना अज्ञात चोरट्यांनी मोहोळ, सांगली, कर्नाटकातील कलबुर्गी, तेलंगनातील सायराबाद येथे चोरी केल्याची माहिती मिळाली. शिवाय ही टोळी मध्यप्रदेशातील इंदौर येथील असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी आरोपींची शोधासाठी जाताना हे आरोपी धुळे जिल्ह्यातील सोनगिरी पोलिस ठाणे हद्दीत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी संशयित कार व त्यातील दोघांना ताब्यात घेऊन विचारपूस केल्यानंतर आरोपींनी राज्यात विविध शहरात चोरी केल्याचे कबूल केले. चोरीतील सोने ते इंदौर मधील सराफाकडे दलालामार्फत लगड करून विकल्याची माहिती दिली. या माहितीवरून पोलिसांनी चोरीचे सोने घेणारा सोनार दिपेंद्रसिंग गुर्जर याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून सोने जप्त केले. ही कामगिरी पोलिस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलिस अधीक्षक हिंमत जाधव, स्थनिक गुन्हे शाखेचे सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक शैलेश खेडकर, सपोनि धनंजय पोरे, पोसई राजेश गायकवाड, ख्वाजा मुजावर नारायण गोलेकर, प्रकाश कारटकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, धनराज गायकवाड, अनिस शेख, अक्षय दळवी, व्यंकटेश मोरे, अक्षय डोंगरे, समीर शेख, बिराजी पारेकर, श्रीकांत गायकवाड, सलीम बागवान, आबासाहेब मुंढे, हरिदास पांढरे, विजयकुमार भरले, रवि माने, समर्थ गाजरे, विनायक घोरपडे, सुनंदा झळके, दिलीप थोरात, व्यंकटेश मोरे यांनी केली.

## मंगळवेढ्यात ४ रोजी कृषी उद्योजकता मेळाव्याचे आयोजन

**सुराज्य/मंगळवेढा**

महाराष्ट्रातील अन्न प्रक्रिया उद्योग निर्मितीसाठी चालना मिळावी आणि सोलापूर जिल्हयातील अन्न प्रक्रिया उद्योग रोल मॉडेल व्हावे. म्हणून येथील शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा या संस्थेच्या वतीने मंगळवेढा महोत्सवात केंद्रीय सूक्ष्म लघु मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे यांच्या उपस्थितीत ४ मे रोजी दुपारी बारा वाजता कृषी उद्योजकता मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेच्या सचिवा प्रियदर्शनी कदम महाडिक यांनी पत्रकार परिषदेत दिली.यावेळी शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. सुभाष कदम उपस्थित होते.

सचिवा प्रियदर्शनी कदम महाडिक म्हणाल्या की,केंद्र सरकारच्या वतीने ग्रामीण भागातील उत्पादित होणाऱ्या अन्नधान्याच्या संबंधित प्रक्रिया करणारे अनेक उद्योग आहेत. मात्र या उद्योगाची माहिती ग्रामीण भागात नसल्यामुळे अनेक जण यापासून वंचित राहिले आहेत, त्यांना या उद्योगाची माहिती व्हावी व आपल्या भागात नवीन उद्योग निर्माण व्हावेत यासाठी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या उपस्थितीत कृषी उद्योजकता मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याचे सांगून भारतात अनेक चांगले अन्न प्रक्रिया उद्योग तयार होऊ शकतात.



त्याला एक चांगली बाजारपेठ मिळाल्यास या उद्योगातून लोकांना उत्पन्नाचे साधन व अनेक बेरोजगारांना रोजगार निर्माण होऊ शकतो.

महिलांना कडधान्य भाजीपाला फळे यातून उपपदार्थ निर्मिती साठी रोजगार मिळणार आहे आंबा, केळी, पपई,पेरू या फळापासून देखील रोजगार निर्मिती महिलांसाठी होऊ शकते. आ.समाधान आवताडे हे या मतदारसंघात औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. सध्या ४० पेक्षा अधिक अन्न उद्योग हे मंगळवेढा व परिसरामध्ये सुरू होऊ शकतात. तालुक्यातील उद्योजक होण्याची गुणवत्ता शेतकऱ्यांमध्ये आहे.

अनेक अन्नधान्याच्या मालाचे उत्पादन होते मात्र त्याचे मार्केटिंग करणे गरजेचे आहे, सध्या शहरी भागात इन्स्टंट फुड उपलब्धती साठी अन्नप्रक्रिया उद्योगात या गोष्टी सोप्या होतात.

त्यामध्ये शरीराला ऊर्जा मिळण्यासाठी वेगवेगळ्या व अन्नपदार्थाची गरज आहे, जिल्हा सह देशात परदेशात बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची गरज आहे.त्यासाठी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या माध्यमातून तालुक्याला आशेचा किरण सापडणार आहे. त्यामुळे राणेचा मंगळवेढा दौरा सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्याला दिशा देणारा ठरणार आहे.



## आरोग्य विमा कवच सभासदांच्या हितासाठी : दिलीप स्वामी

**सुराज्य/सोलापूर**

धकाधकी व ताणतणाव जीवनशैलीमुळे वाढलेला आरोग्य विषयक खर्च पाहता स्वतःचा व कुटुंबाचा आरोग्य विमा असणे ही काळाची गरज असल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले.

याप्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन इशाधीन शेळकंदे हेही उपस्थित होते. या योजनेचे प्रास्ताविक व माहिती चेअरमन विवेक लिंगराज यांनी विशद केले.या विमा योजनेसाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी अजयसिंह पवार, जिल्हा जलसंधारण अधिकारी पंडित भोसले यांचे मार्गदर्शनाखाली केल्याचे चेअरमन विवेक लिंगराज यांनी आपल्या मनोगततून त्यांचे आभार मानले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तज्ञ संचालक डॉ. एस .पी. माने तर आभार प्रदर्शन व्हाईस चेअरमन सुहास चेळेकर यांनी केले.

याप्रसंगी प्रातिनिधिक स्वरूपात पाच सभासद सुबोध सुरवसे, मच्छिंद्र राठोड, ज्ञानेश्वर होटकर, हसन शेख, श्रीशैल देशमुख आदिना प्रदान करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ संचालक श्रीशैल देशमुख दत्तात्रय घोडके, विष्णु पाटील दीपक घाडगे, त्रिमूर्ती राऊत, शहाजान तांबोळी, अनिल जगताप, सुंदरराव नागटिळक, धन्यकुमार राठोड, हरीबा सपताले, सुखदेव भिंगे, मृणालिनी शिंदे, सुनंदा यादगिरी, सभासद प्रताप रुपनर, अल्ताफ पटेल, रेवनसिद्ध म्हेत्रे, सचिव दत्तात्रय देशपांडे आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सचिव दत्तात्रय देशपांडे, सुभाष काळे, अशोक पवार, विनोद कदम आदींनी परिश्रम घेतले.

## नातेपुते केंद्रामध्ये ६४५ पैकी ६४३ मतदान

**सुराज्य/नातेपुते**

अकलुज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नातेपुते केंद्राच्या निवडणूकीमध्ये ग्रा.प. सदस्य मतदारांचे २४७ पैकी २४७मतदारांनी मतदान करून आपला हक्क बजवीला. तसेच विकास सोसायटीचे ३९८ पैकी ३९६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजवीला. नातेपुते येथील डॉ.बाळकृष्ण दाते प्राशाला येथे दोन मतदान केंद्र करण्यात आले होते. यामध्ये बांगार्डे, दहिगांव, देशमुखवाडी, धर्मपुरी, डोंबाळवाडी, शिंदेवाडी, एकशिव, गुरसाळे, हनुमानवाडी, कदमवाडी, कोथळे, कुरभावी, कळंबोळी, कारुंडे, लोंढे-मोहितेवाडी, लोणंद, मोरोची, पळसमंडळ, पिरळे, पिंपरी, फडतरी, फोंडशिरस, तांबेवाडी या गावांचा समावेश होता. मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी सकाळपासूनच सोसायटी व ग्रामपंचायत सदस्य एकजुटीने येऊन मतदानाचा हक्क चुरशीने बजावत होते. यामध्ये मोहिते-पाटील गटा विरूद्ध पद्मजादेवी मोहिते-पाटील, फतेसिंह माने-पाटील, राजकुमार पाटील, प्रकाश पाटील, के. के.पाटील, सोमनाथ वाघमोडे, उत्तम जानकर हे सर्व एकत्र येऊन या गटाची समोरा-समोर निवडणूकीची लढत झाली. निवडणूक मतदान केंद्रावर माजी उपमुख्य मंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, आ.रणजितसिंह मोहिते-पाटील तसेच धवलसिंह मोहिते-पाटील, उत्तमराव जानकर यांनी भेटी देऊन आढावा घेतला. मतदान कें द्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी अकलुज उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.बसवराज शिवपुंजे यांनी मतदान केंद्राच्या ठिकाणी येऊन पहाणी केली.

## महापालिकेने झाडूवालींना दिल्या कमी किमतीच्या साड्या?

### खरेदी व्यवहाराची सखोल चौकशी करण्याची मागणी

**सुराज्य/सोलापूर**

महापालिका घनकचरा विभागाकडील सफाई कर्मचारी, झाडूवाली यांना वाटप केलेल्या साड्यांना काटपदर नाही. सोबत ब्लाऊज पीस दिले नाही. महापालिकेने झाडूवालींना कमी किंमतीच्या साड्या दिल्या आहेत असा आरोप करत या खरेदी व्यवहाराची सखोल चौकशी करावी ,अशी मागणी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने निवेदनाद्वारे महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

महापालिका घनकचरा विभागाकडील सफाई कर्मचारी, झाडूवाली यांना ६०० ते ६३० आकाशी रंगाच्या साड्या वाटप करण्यात आलेल्या आहेत. त्या साडीची किंमत ३६० ते ३७० रुपये असा दर लावण्यात आलेला आहे. जीइएम पोर्टल वरून ही खरेदी करण्यात आली आहे. त्यासाठी संबंधीना अंदाजे ४ लाख रुपये देण्यात आलेले आहेत. त्या साडीमध्ये महिला कर्मचाऱ्यांना ब्लाउज पीस सुद्धा नाही. काटपदर सुद्धा शिवण्यात आलेला नाही. त्या साडीची किंमत बाजारात १०० ते १५० रुपये असून ही साडी खूप महाग लावण्यात आलेली आहे. त्याची सखोल चौकशी करावी,असे निवेदनात म्हटले आहे.



महाराष्ट्र शासन शासकीय कर्मचारी यांना ३८ टक्के महागाई भत्ता दिला जातो. सो. म.पा. कर्मचारी यांना आजला १७ टक्के महागाई भत्ता आहे, तो महागाई भत्ता शासनाने जाहीर केलेल्या दरानुसार कर्मचाऱ्यांना लागू करावा. विभागीय क्रमांक १ ते ८ कडील मजूर बिगारी यांना खाकी रंगचा गणवेश दिला जावा.

सोलापूरमहानगरपालिकेतील कर्मचारी यांना सातवा वेतन आयोग दि. १ जानेवारी २०२१ पासून लागू करण्यात आलेला आहे. परंतु प्रत्यक्ष वेतन दिनांक १ जानेवारी २०२२ पासून देण्यात येत आहे. सातवे वेतन हे आयोगातील फरकाची रक्कम परिपत्रिका मध्ये नमूद प्रमाणे सत्वर कर्मचारी यांना प्रदान करण्यात यावी. यावेळी महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी युनियनच्या या मागण्या संदर्भात सकारात्मक विचार केला जाईल असे आश्वासन दिले, अशी माहिती युनियनचे अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले यांना दिली. यावेळी युनियनचे कार्याध्यक्ष योहान कानेपागुलु, खजिनदार अरुण मेहेत्रे, युनियनचे प्रमुख संघटक रवींद्र कदम, सल्लागार अंबादास घोडकुंबे, चंद्रकांत सर्वगोड आदी उपस्थित होते.

जाहिरात सन २०२२-२३
राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान
आरोग्य विभाग, सो.म.पा.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, आप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर-४१३००१

E-३६४३४ | सामान्य प्रशासन विभाग
जाक्र.सआस/NUHM भरती२३-२४/आस्था-२/२५० | सोलापूर दि.२८/०४/२०२३

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM), आरोग्य विभाग, सोलापूर महानगरपालिका सोलापूर येथून सोलापूर शहरातील विविध आरोग्य केंद्रास्तरावर राबविण्यात येत असलेल्या विविध योजनेकरिता ०९ संवर्गातील ४९ पदांची पदभरती प्रक्रिया कंत्राटी पद्धतीने करार तत्वावर राबविण्यात येत आहे.

पदभरती करण्यात येणारे पदनाम, त्याची शैक्षणिक अर्हता, मानधन, नियुक्तीची कालावधी तसेच शर्ती व अटी व इतर बाबतची संपूर्ण माहिती सोलापूर महानगरपालिकेच्या www. solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
(शीतल तेली-उगले, भा.प्र.से.)
आयुक्त तथा अध्यक्ष,
राष्ट्रीय आरोग्य अभियान, पदभरती निवड समिती सोलापूर

# ४५ दिवसांत चिमणी पाडकाम न झाल्यास जनआंदोलन छेडणार

### सोलापूर विकासमंचचा इशारा

**सुराज्य/सोलापूर**

सोलापूरच्या विकासात आणि होटगीरोड विमानतळावरून नागरी विमानसेवेस प्रमुख अडथळा असलेली .सिध्देश्वर सह साखर कारखान्याची को जनरेशनची चिमणी सोलापूर महानगरपालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी अनाधिकृत बेकायदेशीर ठरवत, ४५ दिवसांत पाडण्याचे आदेश दिले. गेल्या अनेक महिन्यांपासून ह्या विषयासाठी सोलापूर विकास मंचच्या वतीने महानगरपालिका आयुक्तांना वेळोवेळी या बाबत पाठपुरावा केल्या मुळेच हा आशावादी निकाल दिल्याने सोलापूर विकास मंचच्या वतीने घोषित करण्यात आलेले महाराष्ट्र दिना दिवशीचे आक्रमक आणि तीव्र स्वरूपांचे आंदोलन संस्थिगित करण्याचा निर्णय शासकीय विश्रामगृह झालेल्या बैठकीत सोलापूर विकास मंचच्या वतीने घेण्यात आला.



कारखान्याची को जनरेशनची अनाधिकृत बेकायदेशीर चिमणी पाडकाम ४५ दिवसांत झाले नाही तर सोलापूर विकास मंचच्या वतीने सोलापूरात भव्य स्वरूपांचे उद्रेकात्मक ऐतिहासिक जनआंदोलन उभारण्यात येईल तसेच सर्वोच्च न्यायालयात भारतातील अत्यंत दिग्गज आणि वकिलांच्या मार्फत जनहित याचिका दाखल करणार असल्याची माहिती सोलापूर विकास मंचच्या वतीने बैठकीत देण्यात आली. सोलापूर विकास मंचच्या वतीने होटगी रोड विमानतळावरून नागरी विमानसेवा सुरू करण्यासाठी केंद्र, राज्य आणि स्थानिक पातळीवरील संबंधित लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या समवेत बैठक, चर्चा आणि निवेदनांची अनेकवेळा अदान प्रदान करण्यात आले आहे आणि सातत्याने पाठपुरावा देखील करुनही आजतागायत सोलापूरांना विमानसेवे पासून वंचित राहावे लागत असल्याची खंत ह्यावेळी व्यक्त करण्यात आली.

जा.क्र.दुबारा/स.म.नि./बाजाबंद/२३/२०२३
कृषि उत्पन्न बाजार समिती दुधनी
दि.२७/०४/२०२३

जाहीर प्रकटन

तमाम शेतकरी वर्गांना, आडते, व्यापारी, हमाल, तोलार व बाजार आवारातील इतर घटकांना या जाहिर प्रकटनद्वारे कळविण्यात येते की दुधनी कृषि उत्पन्न बाजार समितीची संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणुकीसाठी दि.३०/०४/२०२३ रोजी दुधनी बाजार समितीच्या कार्यालयात व हमाल भवन येथे मतदानाची प्रक्रिया होणार आहे. तरी रविवार दि.३०/०४/२०२३ रोजी कृषि उत्पन्न बाजार समिती दुधनीच्या श्री शांतलिंगेश्वर बाजार पेठेतील सर्व नियंत्रित शेतीमालाचा सौदा, शेतीमालाचा वजनकाटा व इतर सर्व व्यवहार तसेच सदर दिवशी बाजार आवारात शेतमालाचे आवक-जावक बंद राहणार असल्याने शेतकऱ्यांचे गैर सोय होऊ नये म्हणून शेतकरी आणि इतर घटकांनी बाजारपेठेत शेतीमाल विक्रीस आणू नये. दुधनी बाजार समितीस सहकार्य करावे ही नम्र विनंती.

सही/-
सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती दुधनी



## आपुलकी प्रतिष्ठानकडून दिव्यांग व्यक्तीस सायकल भेट

**सांगोला** : आपुलकी प्रतिष्ठानकडून आलेगाव ता. सांगोला येथील कुमार गडहिंरे या दिव्यांग व्यक्तीस वैभव कुमार आलदर ॲडिशनल प्रायव्हेट सेक्रेटरी, रेल्वे राज्य मंत्री दिल्ली, यांच्याहस्ते तीनचाकी सायकल भेट देण्यात आली. त्याचबरोबर त्यांच्या दोन्ही मुलींचा आगामी वर्षाचा शैक्षणिक खर्च उचलण्याचा निर्णय आपुलकीने घेतला आहे. घरची परिस्थिती बिकट, त्यात स्वतः दिव्यांग. पत्नी, दोन मुलींचा सांभाळ करण्यासाठी घराबाहेर पडावेच लागते. दिव्यांग असल्यामुळे जुन्या तीन चाकी सायकलवर भटकंती करायची. पाठीमागून ही सायकल कधी पत्नीने ढकलायची तर कधी मुलीने ढकलायची आणि मग आलेगाव ते सांगोला, जवळा, घेरडी अशा विविध ठिकाणी प्रवास करायचा आणि लोक जे काही देतील त्यात समाधान मानून आपला प्रपंच चालवायचा अशा या दिव्यांग कुमार महादेव गडहिंरे यास आपुलकी प्रतिष्ठानने तीनचाकी सायकल देऊन त्याचा प्रवास आणखी थोडा सुखकर करण्यास हातभार लावला. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, रमेशअण्णा देशपांडे, अरविंद केदार, महादेव दिवटे, प्रमोद दौंडे, अण्णासाहेब मदने, दादा खडतरे, प्रसन्न कदम, शिवदास राऊत, संजय काशीद पाटील, जे. एन. टकले, पिंटू (संभाजी) पाटील, अमर कुलकर्णी, काझी गुरुजी, बापूसाहेब ठोकळे, अजित बनसोडे आदी उपस्थित होते.

## सावता महाराज मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह

**मोडनिंब** : संत शिरोमणी सावता महाराज संजीवनी समाधी मंदिरात हभप गणेश महाराज उखळीकर यांच्या संकल्पनेतुन अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमत भागवत कथा व किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, २८ एप्रिल ते ५ मे दरम्यान हा सप्ताह साजरा होणार आहे. यामध्ये काकडा, भजन, भागवत कथा, प्रवचन,हरिभजन,व दररोज दोन किर्तन सेवा होणार आहे. यामध्ये शुक्रवारी २८ एप्रिल रोजी दहा ते बारा यावेळी दत्ता महाराज फरांदे यांची तर रात्री सात ते नऊ यामध्ये क्रुष्णा महाराज नवले यांचे किर्तन झाले. शनिवारी २९ रोजी दुपारी, भागवताचार्य विष्णु महाराज वांगीकर वरात्री संतोष महाराज वनवे याचे किर्तन होईल. ३० एप्रिल ला दुपारी रामायनाचार्य नामदेव महाराज लबडे, रात्री एकनाथ महाराज माने यांचे किर्तन होईल.१ मेला दुपारी हभप अर्जुन महाराज लाड गुरुजी व रात्री सायंकाळी समस्त वारकरी संघटनेचे अध्यक्ष हभप बंडातात्या कराडकर यांचे किर्तन होईल.

## डाळींची साठेबाजी रोखण्यासाठी प्रशासनास सहकार्य करा : जिल्हाधिकारी


**सोलापूर** : जिल्ह्यात विविध डाळींची साठेबाजी रोखण्यासाठी डाळ मिलमालक, परवानाधारक गोदाममालक, डाळ मिल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनास संपूर्ण सहकार्य करावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी केले. डाळींची साठेबाजी रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांसदर्भात आयोजित बैठकीच्या अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते. जिल्हा नियोजन भवनच्या सभागृहात झालेल्या या बैठकीस पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे, जिल्हा पुरवठा अधिकारी वर्षा लांडगे, अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी विवेक साळुंके यांच्यासह शहरातील डाळ मिलमालक, जिल्ह्यातील सर्व डाळ मिल असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते. डाळींची साठेबाजी रोखण्यासाठी मिल्स व गोदामांची तपासणी करण्यासाठी पथकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या पथकांनी जिल्ह्यातील सर्व डाळ मिल्स व गोदामे यांची काटेकोर तपासणी करावी, अशा सूचना पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना देऊन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर म्हणाले, पाहणीस आलेल्या या पथकांना आवक जावक रजिस्टर व इतर सर्व कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत. डाळींची आवक व जावक याचा हिशोब द्यावा, संकेतस्थळावर सत्य माहिती भरावी, अशा सूचना जिल्हाधिकारी. शंभरकर यांनी यावेळी केल्या. यावेळी डाळ मिलमालकांनी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनास सहकार्य करण्याची हमी दिली.

## भावसार समाजातील महिलांचा सोलापुरात रविवारी मेळावा

**सोलापूर** : भावसार समाज व भावसार महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. ३० एप्रिल रोजी ५० वर्षपूर्ती निमित्त ड्रीम पॅलेस सरस्वती चौक, सेवासदन शाळेसमोर भावसार महिलांचा मेळावा होणार असल्याची माहिती भावसार महिला मंडळ अध्यक्ष सरिता जवळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. या मेळाव्याचे उद्घाटन जीएसटी कमिशनर सुरेंद्र मानकोसकर यांच्या हस्ते तसेच हैदराबाद येथील आयटी इंजिनिअर प्रियंका बर्डे यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच हिंगुलांबिका देवालय ट्रस्टचे किशोर कटारे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या मेळाव्याला सोलापूर शहरातून २ हजार महिला उपस्थित राहणार आहेत, असे भावसार समाज अध्यक्ष गोविंद हिबारे यांनी सांगितले. मेळाव्यात भावसार समाजातील पाच कर्तव्यदक्ष महिलांचा सत्कार करण्यात येणार आहे. यात सिंधुमती कटारे, रुक्मिणीबाई वैकुंठे, उषा अंबुरे, दमयंती पिसे, मंगल मुसळे यांचा कर्तव्यदक्ष महिला पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. मेळाव्यात श्रीमती भावसार स्पर्धा घेण्यात येणार आहेत. स्पर्धेत महिलांनी पारंपारिक तसेच ऐतिहासिक वेशभूषा धारण करून स्वतःचा अल्पपरिचय, सामान्य ज्ञान, प्रश्न उत्तरे अशी निवड फेरी ठेवण्यात येणार आहे. तरी भावसार समाजातील महिलांनी मोठ्या संख्येने मेळाव्यास उपस्थित राहावे असे आवाहन जवळकर यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस गोविंद हिबारे, शशिकला नवले, सुजाता माळवदकर, किशोर कटारे, गोपी नवले, उषा हिबारे आदी उपस्थित होते.


## निधन वार्ता

### डॉ.संजीव कुलकर्णी



**सांगोला** : जवळे येथील डॉक्टर संजीव कुलकर्णी वय६५ यांचे निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, वडील भाऊ असा मोठा परिवार आहे माजी शिक्षणाधिकारी डी वाय कुलकर्णी यांचे ते सुपुत्र होत.

### मधुसूदन कदम



**मोहोळ** : दत्तनगर परिसरात राहणारे निवृत्त आरोग्य विस्तार अधिकारी मधुसूदन कड्याप्पा कदम वय ६८ यांचे दि. २८ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.

# आषाढी वारी यशस्वीपणे पार पाडा : जिल्हाधिकारी

सुराज्य/सोलापूर

**आषाढी वारी यात्रेनिमित्त पालखी सोहळ्याबरोबर मोठ्या प्रमाणात वारकरी व भाविक पंढरपुरात येत असतात. आषाढी वारी व्यवस्थितपणे व यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व विभागांनी अंतर्गत नियोजनाचा आढावा घ्यावा. पालखी सोहळ्यासह सोबत येणारे वारकरी व भाविकांना पालखी मार्गावर व पालखी तळावर आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी परस्पर समन्वय ठेवून योग्य नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिल्या.**



आषाढी वारी प्राथमिक पूर्वतयारी नियोजन आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यंदा आषाढी वारी २९ जूनला भरणार आहे. यात्रा कालावधी १९ जून ते ३ जुलै असा आहे. आषाढी यात्रेनिमित्त महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश इत्यादि राज्यांतून जवळपास १० ते १२ लाख भाविक पंढरपूरमध्ये येत असतात. श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज यासह १० प्रमुख मानाच्या पालख्यांसोबत वारकरी मोठ्या संख्येने श्री क्षेत्र आळंदी व देहु येथून पायी येतात. या पार्श्वभूमिवर ही प्राथमिक बैठक घेण्यात आली.

नियोजन भवन सभागृहात झालेल्या या बैठकीस पोलीस अधीक्षक (ग्रामीण) शिरीष सरदेशपांडे, सहाय्यक जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे, अप्पर जिल्हाधिकारी तथा श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी तुषार ठोंबरे, अतिरीक्त पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, उपविभागीय अधिकारी गजानन गुरव आणि नामदेव टिळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, तहसीलदार सुशिल बेल्हेकर, गटविकास अधिकारी प्रशांत काळे संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर म्हणाले, आषाढी वारी वर्षातील सर्वात मोठी वारी असते. वारी कालावधीत मोठ्या प्रमाणात वारकरी-भाविक पंढरपुरात येतात. त्यांची कोणतीही गैरसोय होऊ नये. पालखी मार्गावर तसेच पालखी मुक्कामाच्या ठिकाणी आवश्यक नियोजन करण्यात यावे. भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी, फिरती शौचालये, आरोग्य सुविधा यासह आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत नियोजन करावे. येणाऱ्या पालखी सोहळ्यांना पालखी मार्गाबरोबरच पालखी तळावर कोणतीही अडचण येणार नाही याची दक्षता घ्यावी. पालखी सोहळा जिल्ह्यात दाखल होण्यापुर्वी वारकऱ्यांसाठी सर्व सोयी सुविधांची सर्व कामे पूर्ण करण्यासाठी नियोजन करावे. पालखी मार्ग, विसावे व मुक्कामांच्या तळाची पाहणी करावी, अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ नुसार घटना प्रतिसाद प्रणाली कार्यान्वित करण्यात येत आहे. जिल्ह्यातील पालखी मुक्काम तळ व पंढरपूर शहरात एकूण २१ आपत्ती प्रतिसाद व मदत केंद्रे स्थापन करण्यात येत आहेत. संबंधित सर्व विभागांनी संभाव्य आपत्कालिन परिस्थिती निर्माण झाल्यास करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घ्यावा. जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, आरोग्य विभाग, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पोलीस, महसूल, जिल्हा पुरवठा, राज्य उत्पादन शुल्क, उपप्रादेशिक परिवहन, अन्न व औषध प्रशासन विभाग, रेल्वे, भारत संचार निगम आदि संबंधित सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवावा, अशा सुचना केल्या. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी तुषार ठोंबरे यांनी मंदिर समितीकडून केलेल्या नियोजनाची माहिती दिली. अतिरीक्त पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांनी पोलीस प्रशासनाने केलेल्या व करावयाच्या कार्यवाहीची माहिती दिली. आणि निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी सादरीकरण केले.

## भरारी पथकाच्या विशेष मोहिमेत तीन दिवसात साडेतीन कोटीच्या वीजचोऱ्या उघडकीस

सुराज्य/सोलापूर

महावितरणच्या सुरक्षा व अंमलबजावणी विभागाने राबविलेल्या तीन दिवसीय विशेष तपासणी मोहिम राज्यात अंदाजे साडेतीन कोटींची तब्बल ३८३ वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आली आहेत.

महावितरणच्या सुरक्षा व अंमलबजावणी विभागाअंतर्गत असलेल्या कोकण, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या चारही परिक्षेत्रांमध्ये २४ ते २६ एप्रिल दरम्यान विशेष तपासणी मोहिम राबविण्यात आली. या विशेष तपासणी मोहिमे दरम्यान एकुण ३८३ वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आणण्यात आलेली आहेत या तीन दिवसांमध्ये नागपूर परिक्षेत्रांतर्गत सर्वाधिक १२१, कोकण परिक्षेत्रात ११७, औरंगाबाद परिक्षेत्रात ९२ तसेच पुणे परिक्षेत्रांतर्गत ५३ वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आलेली आहेत. या वीजचोरी प्रकरणांमध्ये मोठया प्रमाणात घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांचा समावेश आहे. या वीजचो-या प्रकरणी अंदाजे ३ कोटी ५० लाख रूपयांचा दंड आकारण्यात आला असून पुढील कार्यवाही चालू आहे. महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या मार्गदर्शनात ही मोहिम सुरक्षा व अंमलबजावणी विभागाचे कार्यकारी संचालक (प्रभारी) मुंबई सुमित कुमार, यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आली आहे. भविष्यात अशा प्रकारच्या विशेष तपासणी मोहिमा राबविण्यात येणार असल्याने ग्राहकांनी वीजचोरी न करता वीजेचा अधिकृत वापर करून महावितरण कंपनीस सहकार्य करावे असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.



## सिंगल डॉग रजिस्ट्रेशन कॅम्पचे आयोजन

**सोलापूर** : ब्रीडर, ट्रेडर आणि पेटशॉप ओनर असोसिएशनच्या वतीने रविवार दि. ३० एप्रिल रोजी सिंगल डॉग रजिस्ट्रेशन कॅम्पचे आयोजन नूतन मराठी विद्यालय, डफरीन चौक, हरीभाई शाळेजवळ सकाळी ९ ते दुपारी ५ वाजेपर्यंत करण्यात आले आहे, अशी माहिती निशिकांत कोठा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ज्या पाळीव श्वानांचे पेपर्स नसतील अशा सर्व श्वानांचे रजिस्ट्रेशन करण्यात येणार आहे. शिबिरात गौरी नारवळकर उपस्थित राहून श्वानांचे परीक्षण करून प्रमाणपत्र देतील. पशुवैद्यकिय डॉक्टरांकडून मायक्रोचीप टोचविण्यात येणार आहे. या शिबिरात श्वानांची मोफत आरोग्य तपासणी होणार आहे. हे शिबिर पश्चिम महाराष्ट्रातील प्रथम व सर्वात मोठे शिबिर होणार असून सर्व श्वानप्रेमींनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे. या पत्रकार परिषदेत आशिष म्हेत्रे, गुरुराज कुलकर्णी, विशाल राठोड, पवन आयवळे आदी उपस्थित होते.

## सर्व विभागांनी अद्ययावत आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार ठेवावेत : जिल्हाधिकारी

### १ जूनपूर्वी पुरगावात प्रात्यक्षिके

सुराज्य/सोलापूर

मान्सून कालावधीमध्ये जिल्ह्याचे संभाव्य आपत्ती व्यवस्थापन करण्याच्या पार्श्वभूमिवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३२ अन्वये सर्व विभागांनी अद्ययावत आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार ठेवावेत, अशा सूचना जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी येथे दिल्या.



मान्सूनपूर्व तयारीच्या पार्श्वभूमिवर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. नियोजन भवन सभागृहात झालेल्या या बैठकीस पोलीस अधीक्षक (ग्रामीण) शिरीष सरदेशपांडे, सहाय्यक जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे, अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, अतिरीक्त पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले आदिंसह सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व विविध संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

संभाव्य आपत्ती काळात महसूल, पोलीस, पाटबंधारे, आरोग्य, बांधकाम, विद्युत विभाग, जिल्हा परिषद व प्रसारमाध्यमे यांचा योग्य समन्वय ठेवावा जिल्हा व तालुका स्तरावर करावयाच्या तात्काळ उपाययोजना संबंधित विभागांनी कराव्यात. २४७ नियंत्रण कक्षाची स्थापना करावी. जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठका घ्याव्यात. शासकीय यंत्रणा व सेवाभावी संस्थांचे पत्ते, अद्ययावत संपर्क क्रमांक, संपर्क यंत्रणा सक्षम करावी, असे त्यांनी स्पष्ट केले. पोलीस स्थानक अंतर्गत येणाऱ्या अतिसंवेदनशील/संवेदनशील गावांचे, ग्रामपंचायतींचे नियंत्रण कक्ष अद्ययावत ठेवावेत. प्रशिक्षित कर्मचाऱ्याची नियुक्ती करावी. प्रशिक्षित बचाव पथके, होडी/यांत्रिक बोटी, पोहणारे आदि स्थानिक साधनसामग्रीची उपलब्धता तपासावी. तसेच, १ जूनपूर्वी पूरबाधित गावांत कार्याची रंगीत तालिम घ्यावी. संभाव्य पूरपरिस्थितीतबात वेळोवेळी सूचना व जनजागृती प्रत्येक स्तरावरून करण्यात यावी. वीज पडण्याची माहिती देणाऱ्या दामिनी मोबाईल पबाबत जनजागृती करावी, असे त्यांनी सूचित केले.

## राम हे सत्य व लक्ष्मण हे समर्पणाचे प्रतिक : रामराव ढोक महाराज

### रामेश्वर येथे श्री राम कथा संपन्न



**लातूर** : राम हे सत्य तर लक्ष्मण हे समर्पणाचे प्रतिक आहे. त्यामुळे मानवाच्या जीवनात सत्य आणि समर्पणाला अनन्य साधारण महत्त्व आहे. संपूर्ण रामायण समजावून घेण्यासाठी राम जन्म, सज्जनांची संघटना, दुर्जनांचा नायनाट आणि रामराज्य या चार गोष्टी महत्वाच्या आहेत. असे मौलिक विचार रामायणाचार्य ह.भ.प.श्री.रामराव ढोक महाराज यांनी व्यक्त केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे व समस्त गावकरी मंडळ, रामेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने संत श्री गोपाळबुवा महाराज अखंड हरिनाम सप्ताह व श्री राम कथेचे आयोजन रामेश्वर (रुई) येथे करण्यात आले होते. या प्रसंगी त्यांनी राम कथेचा उलगडा व राम आणि रावण यांच्या युद्धांचे वर्णन सांगितले. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे होते. यावेळी एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड, राजेश कराड, रामेश्वरचे माजी सरपंच तुळशीराम दा. कराड, प्रगतीशील शेतकरी काशीराम दा. कराड, कमल राजेखाँ, उषा विश्वनाथ कराड, सौ. आदिती राहुल कराड व रामेश्वरच्या पंचक्रोशितील भाविक उपस्थित होते.

रामराव ढोक महाराज म्हणाले, मानवाचे मन हे सर्वात चंचल आहे. त्याला ईश्वराच्या म्हणजेच रामाच्या चरणी अर्पण करा तर सर्व गोष्टी साध्य होतात. परमार्थाने मानवी मन शुध्द व स्वस्थ राहते. मानवाने कधीही युद्धाच्या भूमिकेत नसावे त्यात घरातील मंडळींचे सर्वाधिक नुकसान होते. जीवन कसे जगावे, मर्यादांचे पालन कसे करावे, एक आदर्श पूत्र कसा असावा या गोष्टींचे पालन सर्वांनी करावे. हरीनाम, अन्नदान, विनम्रता आणि अभिमान या गोष्टींचे पालन जीवनात सर्वांनी करावे.

यावेळी ढोक महाराज यांनी राम आणि रावण यांच्या युद्धांचे वर्णन करून मानव जीवनात शांतीचे स्थान किती महत्वाचे आहे हे सांगितले. त्यांनी सांगितले की, साधू संतांचा अपमान देवता सुद्धा सहन करत नाही. त्यामुळे कोणीही त्यांना त्रास देऊ नये.प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, भारतीय संस्कृती, परंपरा व तत्वज्ञानाचे मूर्तिमंत प्रतिक म्हणून प्रभू श्रीरामाकडे पाहिले जाते. रामेश्वराचे नाव संपूर्ण जगभरात मानवतेचा व विश्वशांतीचा संदेश देणारे गाव म्हणून ओळखले जात आहे. त्याग आणि समर्पणाचे प्रतिक म्हणून रामाकडे पाहिले पाहिजे. भारतातील सर्व धर्म ग्रंथ हे खरे जीवनग्रंथ आहेत. कसे जगावे आणि कसे जगू नये याची शिकवण आपल्याला देत आहेत.या वेळी रामेश्वरच्या पंचक्रोशितील भाविक भक्त आणि माता भगिणी मोठ्या संख्येनी सहभागी झाल्या होत्या. ह.भ.प. शालिकराम खंदारे यांनी प्रास्ताविक केले.

# क्लिनिकमधून चोरट्याने सोन्याची चैन पळवली

सुराज्य/सोलापूर

लोटस एम आर आय स्कॅन क्लिनिक येते चेंजिंग रूम मध्ये पॅन्टच्या खिशात ठेवलेली पन्नास हजार रुपये किमतीची २० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन अज्ञात चोरट्याने हॉस्पिटलच्या चेंजिंग रूम मध्ये प्रवेश करत चोरून नेली आहे. ही घटना २७ एप्रिल रोजी सकाळी अकरा ते साडेअकरा वाजण्याच्या दरम्यान लोटस एम आर आय स्कॅन क्लिनिक मुरारजी पेठ येथे घडली.

अशा आशयाची फिर्याद स्वप्निल बाबुराव होसुर (वय-३०,रा. नवीन दर्बी कलेक्शनच्या पाठीमागे,रेल्वे लाईन,सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल डोके करीत आहेत.

### मागील भांडणाचा मनात घरात पाईपने मारहाण

सोलापूर (प्रतिनिधी) मागील भांडणाचा राग मनात धरून शिवीगाळ करत लोखंडी पाईप व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.२४ एप्रिल रोजी रात्री सव्वा बारा वाजण्याच्या सुमारास कोनापुरे चाळ येथे घडली.

याप्रकरणी मोनेश शंका घंटे (वय-२९,रा.कोनापुरे चाळ, रेल्वे लाईन) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून योगेश नागेश आनंद, व्यंकटेश नागेश आनंद, चंद्रकांत उर्फ सोनू व्यंकटेश, लक्ष्मी नागेश आनंद (सर्व.रा. कोनापुरे चाळ, रेल्वे लाईन) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.फिर्यादी यांच्या घरी मागील भांडणाचा राग मनात धरून वरील संशयित आरोपी यांनी तुम्हाला लय माज चढलाय,तू व तुझा भाऊ अमर तुम्ही आम्हास घरी येऊन मारहाण करता,तुला व तुझ्या भावास जिवंत सोडत नाही असे म्हणून शिवीगाळ करून हातातील लोखंडी पाईप व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आहे.

त्यावेळी फिर्यादीचा भाऊ अमर व त्यांची पत्नी हे भांडण सोडवण्यासाठी आले असता त्यांना देखील लोखंडी पाईप व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी योगेश आनंद याने लोखंडी पाईप फिर्यादीच्या डोक्यात मारून दुखापत केली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल माडे हे करीत आहेत.



### नवीन विजापूर नाका येथे अपघात; कारचालकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) कार क्रमांक एमएच.०१.बीबी.९८९७ यातील चालकाने भरधाव वेगाने व हयगयीने कार चालून विजापूरहून सोलापूरच्या दिशेने येऊन रस्त्यावरील बॅरिकेटला धडकून फिर्यादी सरफराज शहनवाज पठाण (वय-२६,रा. शास्त्रीनगर) हे चालवत असलेल्या दुचाकी क्र.एमएच.१३. डीयु.००८० याला जोराची धडक देऊन फिर्यादी व फिर्यादीचा मित्र सोहेल रफी शेख यांच्या दोघांच्या दुखापतीस कारणीभूत झाला आहे.हि घटना २३ एप्रिल रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास नवीन विजापूर नाका जकात नाक्याजवळ घडली.तसेच कारचालकाने अपघाताची खबर न देता तसाच निघून गेला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल म्हेत्रे हे करीत आहेत.

### अल्पवयीन मुलाला फुस लावून पळवले; अज्ञात इसमावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) राहत्या घरातून पाणी घेऊन येतो म्हणून निघून गेलेला १४ वर्षाचा अल्पवयीन मुलगा हा घरी परत आला नाही.त्यावेळी त्याच्या आई-वडिलांनी व नातेवाईकांनी त्याचा शोध सर्वत्र घेतला असता,मात्र तो मिळून आला नाही.त्यावेळी त्यांची खात्री पटली की,अज्ञात इसमाने अल्पवयीन मुलाला फुस लावून कायदेशीर रखवालीतून पळवून नेले आहे.याप्रकरणी त्या अल्पवयीन मुलाच्या आईने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात हिस्माविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे,घटनेचा तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल चव्हाण हे करीत आहेत.ही घटना २७ एप्रिल रोजी सकाळी घडली.



## सोशल मिडीयावर आक्षेपार्ह पोस्ट; गुन्हा दाखल करण्याची मागणी

**मोहोळ** : इस्लाम धर्माच्या प्रेषिताबाबत अवमानकारक आक्षेपार्ह पोस्ट सोशल मिडियावर प्रसारित करून हिंदू मुस्लीम धर्मियामध्ये जातीय तेढ निर्माण करणाऱ्या कुरुल येथील समाजकंटक लिंगराज निकम याच्यावर कारवाई करावी अशी मागणी मुस्लीम समाजाच्या वतीने मोहोळ येथे करण्यात आली .याबाबत मोहोळच्या निवासी नायब तहसिलदार लिना खरात यांना निवेदन देण्यात आले आहे. कुरुल (ता. मोहोळ) येथील लिंगराज निकम याने फेसबुक व सोशल मिडियावर प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांचेबददल कपोकल्पीत अवमानकारक व आक्षेपार्ह लिखाण केले आहे .हिंदू मुस्लीम समाजामध्ये तेढ तणाव निर्माण करण्याचा व इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांचे चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केलेला आहे यामुळे मुस्लीम समाजाच्या भावना दुखावल्या आहेत. मोहोळ शहर व तालुक्यातील सर्व धर्मियांचा धार्मिक व जातीय सलोखा अबाधित राखण्याच्या दृष्टीने व्देष भावना भडकवणाऱ्या नराधम समाज कंटकावर कडक कायदेशीर कारवाई करावी, लिंगराज निकम यास सोलापूर जिल्हयातून कायमस्वरूपी हददपार करण्यात यावे, त्याचा भारत गॅस डिलरशीप चा परवाना कायम स्वरूपी रदद करण्यात यावा, अशा मागणी मोहोळ शहर व तालुक्यातील मुस्लीम समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत निवासी नायब तहसीलदार लिना खरात यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनावर डॉ रिजवान शेख रमजान ताबोळी नसिर मोमीन रिवाज तलफदार हाजी सुभानी शेख जिब्राईल शेख फारूक शेख नशींब खान सोहेल खान अजरूददीन मुजावर रियाज मुजावर वरीम बरकतअली शेख इलाही शेख रब्बे सलाम अब्दुल बागवान आशपाक युन्नूस शेख नूर रफिक शेख माहिबुब इस्माईल शेख सलिम शिकलकर महंमद तांबोळी गफार बागवान अजिम शेख शकील शेख हाजी अब्दुलशफी शेख महंमद तांबोळी मुन्न शेख जैद तांबोळी उमर शेख साहिल मुलाणी तौफिक पठाण समीर शेख रजाक मुजावर राजू मुजावर आदींसह बहुसख्य सह्या आहेत.

## बचेरी ग्रामस्थांचा बाजार समितीच्या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील बचेरी गावाने निरा देवधरच्या पाण्यासाठी सर्व निवडणुकींवर बहीषकार टाकणयाचा निर्णय घेतला होता.आज अकलूज कृषी उत्पन्न बाजार समीतीची निवडणूक होती या निवडणुकीत बचेरीच्या ११ ग्रामपंचायत सदस्यांनी मतदान केले नाही. तर १३ सोसायटींच्या सदस्यांनी सुध्दा मतदानावर बहीषकार टाकला .यानिमित्ताने बचेरी ग्रामस्थांचा निरा देवधरच्या पाण्यासाठी मतदानावर बहीषकार टाकणयाचा निर्णय यामध्ये एकी दिसुन आली. गेले काही दिवसापासून याबाबत उलटसुलट चर्चा सुरु होती मात्र या चर्चेला मतदानावरील बहीषकाराने पुर्णविराम मिळाला आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीने याची सुरुवात झाली आहे.

## पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार व स्वयंरोजगार मेळावा

**सोलापूर** : कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, सोलापूर आणि एम.आय.टी कॉलेज ऑफ रेल्वे इंजिनिअरिंग,बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार व स्वयंरोजगर मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले होते. यामध्ये १५ उद्योजकांमार्फत प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे १५१ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली असल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे सहाय्यक आयुक्त सचिन जाधव यांनी दिली. या मेळाव्यात औद्योगिक परिसरातील १५ नामांकित उद्योजकांनी सहभाग घेतला होता. त्यांच्याकडून एकूण २ हजार ६०० पेक्षा जास्त रिक्तपद कळविण्यात आलेली होती. ही सर्व रिक्तपदे किमान १० वी, १२ वी, पदवीधर, आयटीआय, डिप्लोमा, बी.एसी, एम.एसी, बँकींग, मशिन ऑपरेटर, इलेक्ट्रीशियन, वेल्डर, फिटर, बी.फार्म, एम.फार्म, नर्सिंग, पॅरामेडीकल, लॅब टेक्टींशियन, मॅकॅनिकल अशा विविध पात्रताधारक उमेदवारांसाठी होती.जिल्हयातील जास्तीत जास्त नोकरीइच्छुक उमेदवारांना या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून नोकरीच्या विविध संधी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या होत्या. सदर रोजगार मेळाव्यात ४३% नोकरीइच्छुक उमेदवारांनी आपला सहभाग नोंदविला होता. त्यामधून एकूण ९ उद्योजकांमार्फत प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे १५१ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. असे कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे सहाय्यक आयुक्त श्री जाधव यांनी सांगितले.

## मंगळवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**सोलापूर** : जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे मंगळवार दिनांक ०२ मे २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सेतू हॉलमध्ये आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली. सोमवार दिनांक ०१ मे २०२३ रोजी महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६३ वा वर्धापन दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी असल्याने माहे मे महिन्यातील जिल्हा स्तरीय लोकशाही दिन मंगळवार दिनांक ०२ में २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आला आहे.या लोकशाही दिनात मागील महिन्यातील प्रलंबित निवेदन व अर्ज, माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार आहे.तसेच नागरिकांच्या लोकशाही दिनातील अर्जावरही कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली.

## स्वेरीत महिलांसाठी मोफत आरोग्य शिबीर

**पंढरपूर**: ज्ञानदानासह इतर कार्ये करत असताना शिक्षिका आणि शिक्षकेतर महिला कर्मचारी यांनी आपल्या आरोग्याकडेही काळजीपूर्वक लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. वाढत्या धकाधकीच्या जीवनात नकळतपणे आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत असते. हाच धागा पकडून गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये शिक्षक विकास कार्यक्रम (फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम)' सेल अंतर्गत महिला शिक्षिका व शिक्षकेतर महिला कर्मचाऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरा'चे आयोजन करण्यात आले होते. पंढरपूर पंचक्रोशीत अल्पावधीतच प्रसिद्ध झालेल्या डॉ. बी.पी.रोंगे हॉस्पिटल तर्फे स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ डॉ.स्नेहा रोंगे यांच्या सहकार्याने स्वेरीतील महिलांच्या आरोग्यासंदर्भातील विविध समस्यांची तपासणी व निराकरण करण्यात आले.

# अक्कलकोट बाजार समितीसाठी ९७.५७ टक्के मतदान

सुराज्य/अक्कलकोट

**अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी चुरशीने ९७.५७ टक्के मतदान झाले. एकूण १६५० पैकी १६२० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. सहकारी सोसायटी मतदार संघात ७४८ पैकी ७३७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. ग्रामपंचायत मतदार संघात ६९५ पैकी ६७० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. हमाल तोलार मतदार संघात ६९ पैकी ६६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. व्यापारी मतदार संघात १३८ पैकी १३७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. व्यापारी मतदारसंघात सर्वाधिक ९९.२७ टक्के मतदान झाले तर हमाल तोलारमध्ये ९५.६५ टक्के तर सहकार सोसायटी मतदार संघात ९८.५२ टक्के व ग्रामपंचायतमध्ये ९६.४० टक्के मतदान झाले.**



अक्कलकोट बाजार समितीच्या निवडणुकीसाठी चुरशीने शांततेत ४ वाजेपर्यंत ९० टक्के मतदान झाले. १६६८ मतदार दारापैकी दुपारी तीन वाजेपर्यंत १२६८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिलेल्या अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक शांततेत उत्साहात पार पडले. लवकरात लवकर मतदान कसे पार पडेल याकडे उमेदवारांचा कल होता. दुपारी उन्हात मतदानाचा वेग कमी झाला. चार वाजेपर्यंत ९० टक्के मतदान पुर्ण झाले होते. अक्कलकोट (दोन), हन्नुर, वागदरी, जेऊर आणि तडवळ असे सहा ठिकाणी मतदान शांततेत पार पडले.

पहिल्या दोन तासात दहा वाजेपर्यंत सोसायटी मतदार संघातून ३३८, ग्रामपंचायत मतदार संघातून १४८, हमाल तोलारमधून ४० व व्यापारी मतदारसंघातून ६२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

पुढच्या दोन तासात बारा वाजेपर्यंत सोसायटी मतदार संघातून १६३, ग्रामपंचायत मतदार संघातून ३०६, हमाल तोलारमधून १० व व्यापारी मतदारसंघातून ४२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

पुढच्या दोन तासात दोन वाजेपर्यंत सोसायटी मतदार संघातून ११, ग्रामपंचायत मतदार संघातून १६, हमाल तोलारमधून ४ व व्यापारी मतदारसंघातून १७ असे एकूण ४८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. सकाळी ८ ते ५ या वेळेत मतदान पार पडले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अमर झालटे व सहाय्यक निवडणूक अधिकारी सिद्धेश्वर कुंभार यांनी काम पाहिले. १८ जागांसाठी ४२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून रविवारी सायंकाळी ५ वाजता अक्कलकोट येथे मतमोजणी होणार आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. राजेंद्रसिंह गौर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पोलीस बंदोबस्त ठेवला होता. कुठेही अनुचित प्रकार घडला नाही.

## पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी ९८ टक्के मतदान

सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी शुक्रवारी शांततेत ९८.८ टक्के मतदान झाले. पंढरपूर बाजार समितीसाठी एकूण ३ हजार ४२९ मतदार असून यापैकी ३ हजार ३६३ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये सहकारी संस्थेमध्ये २ हजार ३२८ मतदारांपैकी २ हजार २७६ मतदारांनी, ग्रामपंचायत मतदार संघात १ हजार १९ मतदारांपैकी १ हजार ६ जणांनी तर हमाल तोलार मतदारसंघात ८२ पैकी ८१ जणांनी मतदानाचा हक्क बजावला.

बाजार समितीसाठी पंढरपूर तालुक्यातील सहा ठिकाणी मतदानाची सोय करण्यात आली होती. यामध्ये पंढरपूर शहरातील अरिहंत पब्लिक स्कूलमध्ये सोसायटी मतदार संघातील ३९३ पैकी ३८४ जणांनी, भाळवणी येथे ४१६ पैकी ४११ जणांनी, भोसे येथे ३७० पैकी ३५८ जाणांनी, करकंब येथे ३४४ पैकी ३३१ जणांनी, सुस्ते येथे ३७७ पैकी ३६८ जणांनी तर अनवली येथे ४२८ पैकी ४२४ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. तर ग्रामपंचायत मतदार संघातून अरिहंत पब्लिक स्कूलमध्ये १९९ पैकी १९७ जणांनी, भाळवणी येथे १७४ पैकी १७२ जणांनी, भोसे ते १७८ पैकी १७३ जणांनी, करकंब येथे १२५ पैकी १२४ जणांनी, सुस्ते येथे १७४ पैकी १७३ जणांनी व अनवली येथे १६९ पैकी १६७ जणांनी मतदानाचा हक्क बजावला.

दरम्यान पंढरपूर बाजार समितीवर परिचारक गटाची सत्ता असून त्यांना श्री विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी आव्हान दिले आहे. शनिवारी मतमोजणी होणार असून यानंतरच बाजार समितीवर झेंडा कोणाचा आहे स्पष्ट होईल.

## मंगळवेढ्यात पाच जागांसाठी निवडणूक

सुराज्य/मंगळवेढा

**कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत आमदार समाधान आवताडे यांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे बबनराव आवताडे यांनी यापूर्वी १३ जागा बिनविरोध करून बाजार समितीवर वर्चस्व कायम ठेवले. शुक्रवार दि. २८ रोजी झालेल्या पाच जागांसाठी ९ उमेदवार निवडणूक रिंगणात होते.**



सहकारी संस्था महिला प्रवर्गाच्या दोन जागेसाठीत ग्रामपंचायत सर्वसाधारण दोन जागेसाठी तीन उमेदवार व ग्रामपंचायतीच्या एका राखीव जागेसाठी तीन असे एकूण ९ अर्ज राहिल्याने निवडणूक पार पडली. यामध्ये बबनराव आवताडे गटाने बाजी मारली.

ग्रामपंचायत अनुसूचीत जाती/जमाती मतदार संघात एका जागेसाठी एकूण मतदान ५२३ झाले. यापैकी वैध मतपत्रिकांची संख्या ५०३ तर अवैध मतपत्रिका २० होत्या.पांडुरंग हरी कांबळे ४२० मते मिळवून निवडून आले. तर त्यांचे प्रतिस्पर्धी पराभूत उमेदवार हौसाप्पा बापू शेंबडे यांना ८२ तर वैभव सायबू सोनवले यांना केवळ एक मत मिळाले.

ग्रामपंचायत सर्व साधारण मतदार संघात दोन जागेसाठी एकूण मतदान ५२३ झाले. पैकी वैध मतपत्रिकांची संख्या ५१९ तर अवैध मतपत्रिकांची संख्या ४, या मतदार संघात काकणकी गंगाधर बसगोंडा यांना ४४१ जगन्नाथ बापू रेवे यांना ४३६ मते मिळाली असून हे दोन्ही उमेदवार निवडून आले.तर त्यांचे प्रतिस्पर्धी पराभूत सोमनाथ महादेव माळी यांना १०१ मते मिळाली.

सहकारी संस्था महिला राखीव मतदार संघ दोन जागेसाठी एकूण मते ८०० पैकी वैध मते ७९६ तर अवैध मते ४,यामध्ये कविता संजय बेदरे ७९४, सविता प्रदिपकुमार यादव यांना ७९४ मते पडली असल्याकारणाने हे दोन्ही उमेदवार निवडून आले आहेत तर त्यांचे प्रतिस्पर्धी पराभूत उमेदवार संगिता सुरेश कट्टे यांना २ मते मिळाली.

या निवडणुकीसाठी निवडणूक सहाय्यक निरिक्षक म्हणून तहसीलदार मदन जाधव, निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आबासाहेब गावडे तर सहाय्यक म्हणून श्रीधर लिंबोळे यांनी काम पाहिले. निवडणुकीसाठी एकूण ४० कर्मचारी काम पहात होते. तर मतदानाच्या वेळी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.




## गृहविज्ञान महाविद्यालयात पारितोषिक वितरण

सुराज्य/अकलूज

**अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित व एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ मुंबई संलग्नित श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील गृहविज्ञान महिला महाविद्यालयाचे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ नुकतेच मोठ्या उत्साहात महाविद्यालयात संपन्न झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अकलूज येथील प्रसिध्द स्त्रीरोग तज्ञ डॉ. सविता गुजर या होत्या तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे हे होते.**

सदर प्रसंगी पालक सभा, अंताक्षरी, वक्तृत्व स्पर्धा, नृत्य स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, निबंध स्पर्धा, बेस्ट स्टुडंट्स ऑफ ईअरचे विविध राऊंड्स इ. चे आयोजन करण्यात आले. यामध्ये वादविवाद स्पर्धेत श्रुती दोषी व सृष्टी पवार (प्रथम), गुलनाज शेख व श्रध्दा इटकर (द्वितीय), काव्य वाचन स्पर्धेत संचिता दिक्षित (प्रथम), काजल कोतमिरे (द्वितीय), वैयक्तिक नृत्य स्पर्धेत सानिका दुपडे (प्रथम), प्राची गायकवाड (द्वितीय), सामूहिक नृत्य स्पर्धेत सिध्दी चव्हाण व जागृती, प्रश्नमंजुषा स्पर्धेत संचीता दिक्षित व करिश्मा कर्चे (प्रथम), सृष्टी पवार व साक्षी भोसले (द्वितीय), रांगोळी स्पर्धेत काजल कोतमिरे (प्रथम), भक्ती पवार (द्वितीय), निबंध स्पर्धेत आरती पवार (प्रथम), प्रणाली फडतरे (द्वितीय), उत्कृष्ट ग्रंथालय वाचक विद्यार्थीनी पुरस्कार आरती पवार, बेस्ट स्टुडंट्स ऑफ द इअर चा पुरस्कार प्रणाली फडतरे या विद्यार्थिनीस प्रदान करण्यात आला तर रनर अप म्हणून आरती पवार व सृष्टी पवार यांना विभागून पुरस्कार देण्यात आला.

या स्पर्धांचे आयोजन महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.


प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे यांनी केले. सूत्रसंचालन आरती पवार व सृष्टी पवार यांनी केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. छाया भिसे यांनी आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. अमित घाडगे, डॉ. भारती भोसले, प्रा. के.के. कोरे, डॉ. ऋषी गजभिये, डॉ. राजश्री निंभोरकर, डॉ. जयशीला मनोहर, कार्यालय प्रमुख विजय कोळी, अविनाश पताळे, सुनीता काटे, दीपक शिंदे, रमजान शेख, दीपा येंजाडे व विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले.

## कुर्ला -कोईमतूर एक्स्प्रेसमधून पावणे दोन लाखांची चोरी

सुराज्य/कुर्डूवाडी : रेल्वेने झोपून प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांची १ लाख ७२ हजारांचा ऐवज असलेली बॅग अज्ञात चोरट्याने पळवून नेली. ही घटना दि. २० एप्रिल रोजी पहाटे ५ वा. सुमारास कुर्ला कोईमतूर एक्सप्रेसमध्ये घडली. याबाबत पी हण्डवी रा. अलूर, आंध्रप्रदेश यांनी कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिसांत उशीराने फिर्याद दाखल केली आहे.

माहिती अशी की, फिर्यादी हे कुर्ला कोईमतूर एक्सप्रेसने एसी ४ सीट नं. ५ वरुन झोपून प्रवास करत असताना सदर गाडी कुर्डूवाडी स्थानक येण्यापूर्वी अज्ञात चोरट्याने ६० हजार रु. किंमतीचा मोबाइल, ७० हजार रु. सोन्याची चेन, २० हजार रु. किंमतीची सोन्याची अंगठी, २० हजार रु. किमतीचे कॉस्मेटीक, रोख २ हजार व कागदपत्रे असलेली बॅग चोरून नेली. याबाबत कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिसात सीसीटीएनएस प्रणाली बंद असल्याने उशीरा गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक यशवंत दगडू शिंदे हे करीत आहेत.




## घराला आग लागून दोन लाख रुपयांचे नुकसान

सुराज्य/श्रीपूर

महाळुंग बाबरी पूल तालुका माळशिरस येथे घरास आग लागल्याने घरातील संसारपयोगी साहित्य जळून दोन ते अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

अधिकृत वृत्त असे की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीसाठी दशरथ जगन्नाथ सरतापे, त्याची आई, पत्नी व मुले हे सर्वजण गेले होते.

या दरम्यान रात्री नऊच्या सुमारास दशरथ सरतापे यांच्या घराला आग लागली. या आगीत घरातील संसारोपयोगी सर्व साहित्य जळून जाऊन त्यामध्ये दोन ते अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. सदर जळीत घराचा पंचनामा महाळुंग तलाठी सिद्धार्थ भोसले यांनी केला आहे.

> दशरथ सरतापे यांचे घर जळून यामध्ये सर्व साहित्य जळाल्याने दोन ते अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. तरी शासनाने जळीतग्रस्त कुटुंबाला लवकरात लवकर मदत देऊन कुटुंबाला आधार द्यावा.
>
> **- मिलिंद सरतापे,**
> रिपाइं माळशिरस तालुका अध्यक्ष.

# पंढरपूर शहरात बेकायदेशीर डिजिटल बोर्ड लावणाऱ्यांवर होणार कायदेशीर कारवाई

## १९ जणांना बजावल्या नोटीसा

सुराज्य/पंढरपूर

**पंढरपूर शहरात बेकायदेशीर डिजिटल बोर्ड लावून सार्वजनिक जागांचे विद्रुपीकरण आणि वाहतुकीला अडथळा निर्माण करणारे जाहिरात व्यावसायिक, व्यापारी आणि डिजिटल प्रिंटिंग करणाऱ्या व्यक्ती विरोधात कडक कारवाई करण्याचा निर्णय पंढरपूर नगरपरिषदेने घेतला आहे. या विषयाच्या अनुषंगाने १९ जणांना कायदेशीर नोटीस बजाविण्यात आल्या आहेत.**


मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील पीआयएल क्र. १५५/२०११ मधील आदेशानुसार महाराष्ट्र प्रिव्हेंशन ऑफ डिफेसमेंट ऑफ प्रॉपर्टी अॅक्ट १९९५ तरतुदींनुसार पंढरपूर शहरात विना परवाना डिजिटल बोर्ड, होर्डिंग्ज, बॅनर्स लावणे गुन्हा आहे. अनेक वेळा सूचना देऊन देखील शहराच्या विविध भागात रस्त्याच्या कडेला, रस्ता दुभाजक आदी ठिकाणी वासे बांबू उभारुन राजकीय व व्यावसायिक बोर्ड लावले जात आहेत.

या बेकायदेशीर डिजिटल बोर्डमुळे शहराच्या सौंदर्यात बाधा पोहचून शहर विद्रूप होत आहे. या विषयाच्या अनुषंगाने अनिकेत मेटकरी, आकाश पवार, अनिल लोखंडे, वैभव साळुंखे, दोस्ती डिजिटल, न्यू दोस्ती डिजिटल, दर्लींग ग्राफिक्स, जव्हेरी डिजिटल, कलासिद्धी डिजिटल आदी संबधित असणाऱ्या १९ व्यावसायिकांना बेकायदेशीर जाहिरात व प्रिंटिंगचे काम थांबविण्याच्या नोटीस बजाविण्यात आल्या आहेत.

त्याचबरोबर बेकायदेशीर व्यावसायिकांना जाहिरात देणाऱ्या राजकीय व्यक्ती अन् व्यापाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय नगर परिषदेने घेतला असून बेकायदेशीर जाहिरात करणाऱ्या व्यापाऱ्यावर व संस्थांवर दंडात्मक कारवाई करुन गुन्हे दाखल केले जाणार आहेत.

शहरातील व्यापाऱ्यांना दंडात्मक कारवाईच्या नोटीसा यापूर्वीच बजाविण्यात आल्या आहेत. तेंव्हा संबधित राजकीय, सामाजिक व्यक्तींनी व व्यापाऱ्यांनी आपले डिजिटल बोर्ड त्वरित काढून घ्यावेत, तसेच सार्वजनिक मालकीच्या भिंतींवर ज्यांनी जाहिराती रंगविल्या आहेत त्यांनी 'जैसे थे' करुन द्याव्यात अन्यथा कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल व होणाऱ्या परिणामास ते स्वतः जबाबदार राहतील, असे नगरपरिषदेच्यावतीने आवाहन करण्यात आले आहे

# तेलाचे साठे शोधण्यासाठी स्वदेशी प्रणाली



✔ सुराज्य/पुणे

समुद्र आणि जमिनीच्या भूगर्भात असलेल्या पाषाणांचा वेध घेऊन ध्वनिलहरींद्वारे त्यात कच्चे तेल आणि वायूचे साठे कोठे आहेत, हे शोधून काढणारी प्रणाली प्रगत संगणन विकास केंद्राने (सी-डॅक) विकसित केली आहे. आतापर्यंत देशातील तेल, वायू कंपन्यांना या प्रणालीसाठी परदेशी कंपन्यांवर अवलंबून रहावे लागत होते; पण सी-डॅक'च्या नव्या प्रणालीमुळे कंपन्यांच्या वेळेची आणि पैशांची बचत होणार आहे.

सध्या या प्रणालीची विविध कंपन्यांकडून चाचणी घेतली जात असून, पुढील वर्षी ती कार्यान्वित केली जाईल, अशी माहिती सी-डॅक'चे संचालक ई. मगेश यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली. ही प्रणाली विकसित करणाऱ्या सिस्मिक मॉडेलिंग' विभागाच्या सहसंचालक रिचा रस्तोगी, सल्लागार सुहास फडके आदी या वेळी उपस्थित होते.

आतापर्यंत अमेरिका आणि युरोपीय देशांमध्ये ही यंत्रणा विकसित करण्यात येत होती. आजही या कंपन्या भारतीय तेल कंपन्यांना ही सेवा पुरवतात. त्यासाठी ते वर्षाला कोट्यवधी रुपये आकारतात. या प्रणालीमुळे भारतीय तेल कंपन्या परदेशी कंपन्यांवर अवलंबून न राहता स्वदेशी यंत्रणा वापरू शकतील, असे रिचा रस्तोगी यांनी सांगितले. ही प्रणाली त्या कंपन्यांच्या तुलनेत अधिक परवडणारी असेल, असा दावाही त्यांनी केला.

सी-डॅक'ने नॅशनल सुपर कम्प्युटिंग मिशन'अंतर्गत ही स्वदेशी बनावटीची प्रणाली विकसित केली असून त्यासाठी ओएनजीसी' आणि आयआयटी रुरकी यांचे सहकार्य मिळाले आहे. आयआयटी रूरकी'ने डेटाच्या अभ्यासासाठी फिजिक्सच्या' अचूक पद्धतींबाबत मार्गदर्शन केले असून चाचणी आणि डेटा संदर्भात ओएनजीसी' मदत करणार आहे. सी-डॅक'तर्फे आज शुक्रवारी (२८ एप्रिल) एचपीसी इन सिस्मिक इमेजिंग : सीईंग बिलो दर अर्थ्स सरफेस या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत सिस्मिक इमेजिंग' या विषयावर चर्चा करण्यात येणार असून तेल उद्योग, संशोधन संस्था, शैक्षणिक संस्थांतील तज्ज्ञांचा या कार्यशाळेत सहभाग असणार आहे.

# बारसू पेटले, शेतकरी आक्रमक

## अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या, रणरणत्या ऊन्हात लाठीचार्ज

✔ राजापूर/वृत्तसंस्था

**राजापूर बारसू परिसरात पुन्हा एकदा वातावरण तापले आहे. येथील महिला व ग्रामस्थ कोणत्याही परिस्थितीत आम्ही सर्वेक्षण बंद पडणारच या भूमिकेवरती ठाम आहेत. येथील महिलांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. पोलीस प्रशासनाकडून त्यांना सांगण्यात आल्यावरही आंदोलक माती परीक्षण होऊ न देण्यावर ठाम आहेत. त्यामुळे पोलिसांना पुन्हा एकदा सौम्य लाठीमार करावा लागला आहे. या सगळ्या प्रकरणी आता पोलिसांकडून काहीजणांची धरपकड सुरू करण्यात आली आहे. पोलिसांनी रणरणत्या उन्हात अश्रूधुराच्या नळकांड्या फोडून आंदोलकांना पांगविण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान काही आंदोलनकर्त्यांना उष्माघातामुळे चक्करही आली. गेले दोन दिवस काहीसं शांत असलेलं बारसू पुन्हा पेटलं आहे. शेकडो पोलिसांचा फौजफाटा इथे तैनात करण्यात आलाय.**

शेतकऱ्यांच्या विरोधानंतर माती परीक्षण करण्यावर सरकार ठाम आहे. शेतकऱ्यांनी चर्चेसाठी यावं, आम्ही चर्चेसाठी तयार आहोत, आम्हाला जबरदस्ती करायची नाहीये. मात्र आंदोलकांनी विरोधाला विरोध करु नये, अशी विनंती सरकारच्या वतीने मंत्री उदय सामंत यांनी केली आहे. दुसरीकडे ही विनंती आंदोलक शेतकऱ्यांनी धुडकावून लावत प्रदूषणकारी प्रकल्प आम्हाला नकोच, म्हणत आपल्या भूमिकेवर ठाम आहे.

जिल्ह्यातील प्रस्तावित बारसू रिफायनरीसंदर्भात गुरुवारी शिवसेना भवन येथे विनायक राऊत यांनी पत्रकार परिषद घेत ग्रामस्थांच्या समस्यांचा पाढा वाचला. यावेळी उपनेते रवींद्र मिर्लेकर, माजी आमदार दगडू सकपाळ उपस्थित होते. सरकारकडून सुरू असलेल्या दडपशाहीची आणि पोलिसी बळाचा गैरवापर करून कशा प्रकारे ग्रामस्थांमध्ये दहशत पसरवली जात आहे याबाबत माहिती दिली.












### विनायक राऊत पोलिसांच्या ताब्यात

तत्पूर्वी बारसू येथील प्रकल्पविरोधकांची भेटीसाठी निघालेले खासदार विनायक राऊत यांची गाडी पोलिसांनी अडवली होती. पोलिसांनी त्यांना आंदोलकांपर्यंत पोहोचू दिले नाही. पोलिसांच्या या दडपशाहीचा निषेध म्हणून खासदार राऊत यांनी शिवसैनिकांसह रानतळे येथे रस्त्यावर ठिय्या मांडला.

### बारसूमध्ये सध्या काय परिस्थिती?

रिफानरीच्या माती सर्व्हेक्षणाला विरोध करण्यासाठी माळरानावर प्रकल्पविरोधक जमले असून त्यांची भेट घेण्यासाठी निघालेले शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार विनायक राऊत यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांना राजापूर येथील पोलीस स्थानाकात नेण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. राऊत यांच्यासह संपर्क प्रमुख सुधीर मोरे, जिल्हाप्रमुख विलास चाळके, तालुकाप्रमुख कमलाकर कदम, तात्या सरवणकर यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# संपत्तीची याचिका कोर्टाने फेटाळली

✔ सुराज्य/मुंबई



ठाकरे गटाची संपत्ती शिवसेनेला देण्याबाबतची याचिका फेटाळून लावण्यात आली आहे. वकिल आशिष गिरी यांनी ही याचिका दाखल केली होती. त्यांची संपत्तीवर दावा करणारी ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. आशिष गिरी यांच्या शिवसेना (शिंदे गट) यांच्याशी काहीही संबंध नाही, असं म्हणत न्यायालयाने ही याचिका फेटाळली आहे.

निवडणूक आयोगाने पक्षाचं नाव आणि चिन्ह यावर निर्णय दिल्यानंतर, हे स्पष्ट झालं होतं की अधिकृत शिवसेना ही शिंदे गटाची आहे. त्याचाच आधार घेत आशिष गिरी या वकिलांनी ठाकरे गटाची मालमत्ता शिवसेनेला मिळावी, अशी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. शिवसेनेची (ठाकरे गट) जी काही मालमत्ता आहे. शिवसेना भवन, स्थावर आणि जंगम मालमत्ता शिवसेनेला( शिंदे गट) मिळावी, अशी याचिका गिरी यांनी दाखल केली होती. यावर शिवसेनेने (शिंदे गट) आपला आशिष गिरी यांच्याशी काहीही संबंध नसल्याचं सांगितलं होतं. सर्वोच्च न्यायालय म्हणालं की आधीच याबाबत आधीच एक याचिका दाखल असताना नवी याचिका दाखल करणारे तुम्ही कोण? असं विचारत न्यायालयाने गिरी यांची याचिका फेटाळून लावली आहे. वकिल आशिष गिरी यांनी दाखल केलेल्या याचिकेत शिवसेनेचा (ठाकरे गट) पक्षनिधी, याशिवाय संपत्ती, संस्था, कार्यालय, शाखा सर्व शिंदे गटाच्या ताब्यात द्या. शिवसेना पक्ष कुणाचा यावर निवडणूक आयोगाने निर्णय दिला आहे.



# जांभूळचिप्समधून अर्थार्जन

फळांवर प्रक्रिया करून अनेक पदार्थ बनवून त्याद्वारे अर्थार्जनाचा नवा पर्याय उपलब्ध होऊ शकतो. जांभळाचंच उदाहरण घ्या ना. जांभळापासून ज्यूससारखे पदार्थ आजवर ऐकून होतो. परंतु आता जांभूळ चिप्स बनवण्यात आल्या असून त्या मधुमेहावर लाभदायी ठरत आहेत.

आयुर्वेदात आणि युनानी उपचार पद्धतीत डायबेटीसवर उपचारासाठी पूर्वीपासून जांभूळ फळाची उपयुक्तता स्पष्ट केली आहे. जांभळात भरपूर प्रमाणात खनिजे आणि जीवनसत्त्वे आढळून आली आहेत. जांभळात असलेल्या ग्लुकोसाईड्समुळे रक्तातील शर्करा नियंत्रित राहते. तसेच हृदय आणि यकृताच्या तक्रारींवरही जांभूळ उपयुक्त असते. तसेच जांभूळ फळ डायरिया, पोटाच्या तक्रारींवरही उपयुक्त असते. परंतु हे हंगामी फळ आहे आणि विशिष्ट हंगामात फक्त काही दिवस विक्रीस उपलब्ध असते. तसेच जांभळाची टेबल लाईफही फारच कमी असते. त्यामुळे औषध म्हणून वर्षभर त्याचा उपयोग करता येत नाही. ही समस्या ओळखून आता जांभळाचे चिप्स बनविण्याचे तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे. त्यामुळे आता वर्षभर जांभळाचे चिप्स उपलब्ध होणार आहेत.

खरेतर हे चिप्स जांभूळ फळाचा लगदा करून त्यापासून बनवतात. तसेच अशा चिप्सच्या चवीत आणि गुणवत्तेत नैसर्गिक जांभळाच्या तुलनेत काहीही फरक नसतो. अश चिप्समध्ये साखर, मीठ, कृत्रिम रंग आणि इसेन्स टाकण्याचे कंपनीने कटाक्षाने टाळले आहे. डायबेटीक पेशंटने तर एक ते दोन चिप्स (५ ते १० ग्रॅम) रोज घेतले पाहिजेत. ◆◆◆

# करा चिकू पिकाचं रक्षण

चिकूच्या पिकाला बी पोखरणाऱ्या आळीपासून धोका असतो. किडीची अळी फळाच्या 'बी' मध्ये थेट प्रवेश करून आतील बीजदले पोखरून खाते. एका फळात एकच अळी आढळते. अळी फळाच्या गराला कोणत्याही प्रकारचे नुकसान करत नाही. ही कीड पतंग वर्गातील असून तिचो शास्त्रीय नाव ट्रायमॉलिटीस असे असून टॉर्ट्रीसीडी हे तिचे कूळ आहे. या किडीचे पतंग आकाराने लहान असून त्याचे पुढील पंख पांढऱ्या रंगाचे असतात आणि त्यावर तपकिरी रंगाची नक्षी असते. मादी पतंग नर पतंगापेक्षा मोठा असून त्याचे पोट नर पतंगाच्या तुनलनेत जास्त फुगीर असते. मादी पतंग सुमारे २०० ते २७० अंडी ८ ते १० आणे तयार झालेल्या फळावर प्रति फळ १ ते २ या प्रमाणात घालते. अंडी अंडाकृती असून अतिशय चपटी असतात. नुकतीच घातलेली अंडी ही पारदर्शक असून अळी बाहेर पडण्याच्या स्थितीत फिकट तपकिरी होतात. अंडी उबविण्याचा कालावधी ११ दिवसांपर्यंत आहे. या कालावधीतील हवेतील बाष्प हे महत्त्वाची भूमिका दाखवते. अंड्यातून नुकतीच बाहेर पडलेली अळी फिक्कट केशरी रंगाची असून डोके गर्द तपकिरी रंगाचे असते. तर पूर्ण वाढलेली अळी




गर्द गुलाबी रंगाची असून ८ ते ९ मि.मी. लांब असते. अळीची संपूर्ण वाढ फळाच्या आतील बीमध्ये पूर्ण होते. पूर्ण वाढलेली अळी फळाला २-३ मि.मी. व्यासाचे छिद्र पाडून बाहेर येते आणि आपल्या तोंडावाटे बाहेर टाकलेल्या चिकट धाग्याला लोंबकळत राहते. त्यानंतर ती झाडावरील कोवळ्या पानांवर किंवा झाडाखाली सुक्या पानांमध्ये कोषावस्थेत जाते. कोष हा पानाची कडा दुमडून आत रेश्मी आवरणात लपेटलेला असतो. कोष फिक्कट तपकिरी रंगाचा असतो. कोषावस्था १०-१२ दिवस असते संपूर्ण जीवनक्रम एक ते दिड महिन्यात पूर्ण होतो.

उपाय : चिकू बागेतील पालापाचोळा व प्रदुर्भावित चिकूचे अवशेष जागोजागी छोटे ढीग करून जाळून टाकणे. चिकू बागेतील झाडाच्या खालची जमीन नांगरून उलवटपालट करणे. चिकू झाडांची योग्य छाटणी करून बाग विरळ ठेवणे. बागेमध्ये प्रकाश सापळ्यांचा वापर करावा. चिकूवरील बी पोखरणाऱ्या अलीच्या नियंत्रणासाठी डेल्ट्रामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही १ मि.ली./लिटर किंवा प्रोफोनोफॉस ५० टक्के प्रवाही १ मि.लि./लिटर किंवा लॅम्बडासिहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही १ मि.लि./लिटर या कीटकनाशकाच्या फवारण्या कराव्यात. पहिली फवारणी पावसाळा संपताच करावी व त्यानंतर एक महिन्याच्या अंतराने ३ फवारण्या कराव्यात. मात्र कीटकनाशक निवडताना कोणतेही किटकनाशक लगेचच्या फवारणीत परत वापरू नये. ◆◆◆

**खाद्याचा दर्जा कमी न करता किंवा त्याची गुणवत्ता एका ठराविक पातळीत ठेवण्यासाठी काही अपारंपरिक खाद्यघटकांचा जनावरांच्या आहारात समावेश करणे ही आता काळाची गरज बनली आहे. काही प्रमुख अपारंपरिक खाद्य पुढीलप्रमाणे**

# वापर अपारंपरिक खाद्याचा



एका ठराविक पातळीत ठेवण्यासाठी काही अपारंपरिक खाद्यघटकांचा जनावरांच्या आहारात समावेश करणे ही आता काळाची गरज बनली आहे. काही प्रमुख अपारंपरिक खाद्य पुढीलप्रमाणे –

- **बाभळीच्या शेंगा –** बाभळीच्या शेंगा देशात सर्वत्र आढळतात. शेळ्या-मेंढ्या त्या आवडीने खातात. या खाद्यात तंतुमय पदार्थांचे प्रमाण जास्त असल्याने हे खाद्य गुरांच्या आहारात ५ ते १० टक्के वापरता येते. बाभळीच्या बियांमधील डिंकासारखा पदार्थ काढून टाकल्यानंतर या बियांचा खाद्यामध्ये वापर करणे योग्य असते. या बियांमध्ये १३.८ टक्के पचनीय प्रथिने आणि ५९ टक्के एकूण पचनीय पदार्थ असतात. दुभत्या गायीच्या खाद्यामध्ये १५ टक्केपर्यंत या बियांचा वापर करता येतो. संकरित वासरांसाठी यांचे प्रमाण ३९ ते ४० टक्के ठेवता येते. या बियांमध्ये टॅनिनचे प्रमाण ५ टक्के एवढे असते.
- विलायती किंवा वेड्या बाभळीच्या वाळलेल्या शेंगांची पावडर किंवा पीठ जनावरांच्या आहारात २० टक्के या प्रमाणात वापरतात. यामध्ये पचनीय प्रथिनांचे प्रमाण ७ टक्के तर एकूण पचनीय पदार्थांचे प्रमाण ७५ टक्के असते.
- **चिंचेच्या बिया –** टरफल काढून चिंचोक्यांचे पीठ पाण्यात काही वेळ भिजत ठेवावे. नंतर पाणी काढून गुरांना २० ते २५ टक्के या प्रमाणात खाऊ घालता येते. चिंचोक्याच्या गरामध्ये पचनीय प्रथिने १.२६ टक्के तर एकूण पचनीय पदार्थांचे प्रमाण ६३ ते ६५ टक्के असते. तसेच यामध्ये कोणतेही अपायकारक घटक नसतात.
- **तरोटा बिया –** तरोट्याची रोपटी कुठेही उगवलेली असतात. ही रोपटी सहसा जनावरे खात नाही. परंतु या बिया उकडून खाऊ घातल्यास गुरे सहज खातात. याचा वापर १५ टक्क्यांपर्यंत गुरांच्या आहारात वापरण्यास हरकत नसते. तसेच यामध्ये प्रथिनांचे प्रमाण बरेच असते.

◆◆◆

EuroGap® Certification

# युरोगॅप

आपला शेतमाल युरोपच्या बाजारपेठेत पाठविण्यासाठी युरोपीयन देशांनी युरोगॅप हे प्रमाणपत्र गुणवत्तेसाठी बंधनकारक केलेले आहे. युरोगॅप प्रमाणपत्र म्हणजे युरोपियन रिटेल पार्टीज गुड ॲग्रीकल्चरल प्रॅक्टीसेस. युरोमधील विक्रत्यांनी चांगल्या कृषी उत्पादन पद्धतीसाठी तयार केलेली एक योजना म्हणजे युरोगॅप सर्टीफिकेट होय. या योजनेस डच कौन्सिल, दरलॅण्ड यांनी युरोपीयन प्रमाणके नुसार मान्यात दिलेली आहे. ◆◆◆

# धनदायी पीक

तृणधान्य पिकांच्या उत्पादनामध्ये गहू आणि भात पिकानंतर जगात मक्याचा तिसरा क्रमांक लागतो. मक्याच्या कणसाचा उपयोग मोठ्या प्रमाणात भाजून खाण्यासाठी केला जातो. मक्याच्या दाण्यापासून लाह्या, चिवडा, पीठ बनविले जाते. मक्याच्या पिठाचा भाकरी, पाव आणि चपाती बनवण्यासाठीही वापर करतात. अन्नधान्याव्यतिरिक्त मक्याचा उपयोग स्टार्च, सायरप, अल्कोहोल, ॲसिटीक व लॅक्टीक ॲसिड, ग्लुकोज, डेक्स्ट्रोज, प्लास्टिक धागे, गोंद, रंग, कृत्रिम रबर, रेग्झीन तसेच बुटपॉलिश इत्यादी पदार्थ तयार करण्याकरिता होतो. मक्यामध्ये ३ ते ७ टक्के एवढे तेलाचे प्रमाण असते. हे तेल हृदयरोगावर आशादायक उपचार म्हणून पुढे येत आहे. जनावरांसाठी हिरवा सकस चारा म्हणूनही मक्याचा चांगला



उपयोग होतो, म्हणून मक्यास चारा पिकांचा राजा असे म्हणतात. तसेच मुरघास, पशुखाद्य व कोंबडीचे खाद्य तयार करण्यासाठी मका एक उत्तम पीक आहे.

मक्याकडे केवळ एक तृणधान्य पीक न बघता त्याचे अन्नधान्य, औद्योगिक आणि औषधी उपयोगांचे महत्त्वही शेतकऱ्यांना पटावे यासाठी इंटरनेटवरील हा फोटो उत्तम प्रेरणा देत आहे. मक्याच्या दाण्याकडे केवळ दाणे न बघता एक पैसे देणारे पीक म्हणूनही त्याचा विचार व्हावा, हेच या चित्रातून व्यक्त होत असावे. ◆◆



# डाळिंब उत्पादकता

देशात सर्वाधिक डाळिंब उत्पादन महाराष्ट्रात होते. त्या पाठोपाठ कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरात, तमिळनाडूचा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात सोलापूर, सांगली, पुणे, नाशिकसह आठ जिल्ह्यात डाळिंबाचे प्रामुख्याने उत्पादन होते. राज्यात डाळिंबाचे क्षेत्र ९८ हजार ६०० हेक्टर इतके आहे. तर देशात दिड लाख हेक्टर इतके एकून क्षेत्र आहे. आपल्या राज्यात गणेश, मृदुला, आरक्ता आणि भगवा या वाणांच्या डाळिंबाचे उत्पादन मुख्यत्वे घेतले जाते. ◆◆◆

# मिलिबगचा धोका

शेतपीकांवर पडणाऱ्या अनेक रोगांविषयी-किडींविषयी शेतकऱ्यांना बरेचदा पुरेसे ज्ञान नसते. मिलीबग ही यापैकीच एक. आज मिलिबगमुळे सर्वच पिकांना धोका निर्माण झाला आहे. मिलिबग किडीची मादी एकाचवेळी ५०० पिलांना जन्म देत असते. त्यामुळे त्यावर नियंत्रण मिळविणे जिकिरीचे होते. त्यासंदर्भात कारवाई करण्यासाठी शेतकऱ्यांनी उन्हाळ्यात सामूहिकरीत्या आपल्या शेतातील काडी-कचरा जाळून नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करावा. तात्पुरता पर्याय म्हणून इथॅडो क्लोपरीड हे औषध १० लिटर पाण्यात २० मिली मिसळून त्याची फवारणी करावी किंवा दशपर्णी अर्क अथवा निंबोली अर्काची फवारणी करावी.

मिलिबगमुळे आजारांचा धोका – मिलिबगचे कीटक अन्न किंवा फळावाटे पोटात गेल्यास डायरिया, हगवण, उलट्या यासारखे आजार होऊ शकतात. त्याचबरोबर अंगावर बारीक पुरळ उठू शकते.

तसेच दीर्घकालीन आजाराचा सामना करावा लागतो. त्यामुळे मिलिबगग्रस्त फळे खाण्याचे टाळावे. शंका आल्यास फळे स्वच्छ धुवून घ्यावीत किंवा मिठाच्या द्रावणात १५ मिनिटे बुडवावी. मिलिबगमुळे पाळीव प्राण्यांवरही आजार येऊ शकतात. म्हणून मिलिबगग्रस्त फळे किंवा त्यांचे अवशेष पाळीव प्राण्यांना खाण्यास देऊ नयेत. ◆◆◆



# सोलापुरात वादळी पावसाचा तडाखा



▪ वादळी वाऱ्यामुळे एम्लॉयमेंट चौकातील कामत हॉटेलसमोरील झाड गाडीवर पडले. त्यामुळे गाडीचे नुकसान झाले.







शहरातील अभिमान श्री रोड येथे विष्णू दत्तात्रय वाकचौरे यांच्या घरावर वीज पडली. यामध्ये त्यांच्या अंगणातील फरशीचे तुकडे पडले तर घरातील खिडकीच्या काचाही फुटल्या.





शुक्रवारी सायंकाळी झालेल्या जोरदार पावसामुळे वसंत विहार अनेक झाडे पडली तसेच अनेक घरांची पडझड झाली. मात्र यामुळे कोणतीही जिवीतहानी झाली नाही.



माजी पालकमंत्री आमदार विजयकुमार देशमुख यांनी अभिमान श्रीनगर येथे विष्णू वाघचौरे यांच्या घरावर वीज पडलेले ठिकाणी भेट दिली व तहसीलदारांना पंचनामाचे आदेश देऊन लवकरात लवकर पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी केली.

संचालक मंडळ निवडणूक २०२३-२८
कृषी उत्पन्न बाजार समिती, दुधनी
भारतीय जनता पार्टी व मित्रपक्ष प्रणित
श्री सिध्दरामेश्वर शेतकरी परिवर्तन पॅनलचे
अधिकृत उमेदवार

सहकारी संस्था, सर्वसाधारण
अ.क्र. १ कोगनुर विश्वनाथ निंगप्पा छत्री
अ.क्र. २ झळकी मल्लिकार्जुन मडोळप्पा छत्री
अ.क्र. ३ नागुर विश्वनाथ तुकप्पा छत्री
अ.क्र. ४ परमशेट्टी सातलिंगप्पा सैंदप्पा छत्री
अ.क्र. ५ बाके सिध्दाराम आणप्पा छत्री
अ.क्र. ६ बिराजदार देवेंद्र सिद्राम छत्री
अ.क्र. ७ राठोड मोतीराम शिवू छत्री

सहकारी संस्था, महिला
अ.क्र. ८ मचाले सुवर्णा सुधीर छत्री
अ.क्र. ९ सालेगांव अश्विनी विजयकुमार छत्री

सहकारी संस्था, इतर मागासवर्गीय
अ.क्र. १० शेख वहिदपाशा इब्राहिम छत्री

सहकारी संस्था, विमुक्त जाती भटक्या जमाती
अ.क्र. ११ पुजारी निंगण्णा सिद्राम छत्री

ग्रामपंचायत सर्वसाधारण
अ.क्र. १२ तोळणूरे सिध्दाराम निलकंठ छत्री
अ.क्र. १३ बिराजदार मल्लिनाथ बसवंत छत्री

अनुसुचित जाती - जमाती
अ.क्र. १४ इटेनवरु विश्वनाथ विठ्ठल छत्री

आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक
अ.क्र. १५ बिराजदार लक्ष्मीपुत्र रामेश्वर छत्री

हमाल व तोलार
अ.क्र. १६ मानकर सैंदप्पा गुरप्पा छत्री

रविवार, दि. ३०/०४/२०२३ रोजी
सकाळी ७ ते ४ पर्यंत मतदान स्थळी

शेतकऱ्यांचे हित हेच आमचे ध्येय

छत्री
या चिन्हावर फुलीचा शिक्का मारुन दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या श्री सिध्दरामेश्वर शेतकरी परिवर्तन पॅनलला प्रचंड बहुमताने विजयी करावे हि नम्र विनंती.

छत्री

प्रकाशक : महिबुब मुल्ला, गिरमल गंगोंडा, भिमा धोत्री, अप्पू कोटगीमठ, अरविंद ममनाबाद, महादेव पाटील, विठ्ठल कोळी, अशोक काळे, काशिनाथ प्रचंडे, शिवप्पा हिळ्ळी, रमेश उप्पीन, तुकाराम पाटील, दीपाली आळगी, आप्पाशा पुजारी, महादेव चव्हाण, चंदू वांगे, धोंडूराज बनसोडे, अंबिका अचगोंडा, श्रीमंत बिराजदार, नागप्पा व्होडोर, बापू क्यार, फकिरप्पा बोरगाव, अय्यप्पा हौदे, अशोक पाटील, जयशेखर पाटील, महेश पाटील, हणमंत कलशेट्टी, बसवराज हौदे, काशीनाथ येरगल.



## अक्कलकोट तालुक्यात दुसऱ्या दिवशीही अवकाळी पाऊस

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील तडवळ, खानापूर, गुड्डेवाडी, म्हैसलगीसह परिसरात विजेच्या गडगडाटवटासह दुसऱ्या दिवशी शुक्रवारीही अवकाळी पावासाने हजेरी लावली. अचानक सायंकाळच्या सुमारास जोरदार मेघगर्जनेसह वादळी वा-यासह जोराचा पाऊस पडला.

मैंदर्गी, अक्कलकोट शहरासह खैराट, किरनळळी, याठिकाणी पाऊस पडल्याने रस्त्यावरून पाणी वाहू लागले. उकाड्याने त्रस्थ झालेल्या नागरिकांना यामुळे दिलासा मिळाला. पण जोरदार वा-यामुळे वीज गायब झाली. दुपारपासुनच खानापूर येथे वादळी वाऱ्यासह पाऊस पडला. खानापूर, हालहळळी (अ), चप्पळगांववाडी परिसरात साडेचार पासून विजेच्या गडगडाट वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. हालहळळी( अ) येथील यात्रेच्या तिसऱ्या दिवशी पावसाने खोळंबा केला. अक्कलकोट तालुक्यात विजेच्या कडकडामुळे तीन गाईसह एका वासराचा मृत्यू झाल्याची चर्चा परिसरात रंगली होती. कोर्सेगांव येथे शेतामध्ये पाणी थांबले होते.



शुक्रवारी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे देगाव रस्त्यावरील खांब पडल्याचे दिसून आले.

## हुतात्मा स्मृती मंदिर परिसराला ड्रेनेज पाण्याचा विळखा

### व्यवस्थापक प्रदीप जोशींनी हाती घेतला सफाईसाठी खराटा

सुराज्य/सोलापूर

मुसळधार अवकाळी पावसाने महापालिकेच्या हुतात्मा स्मृती मंदिरची दुरवस्था केली. पावसाने ड्रेनेज तुंबून स्मृती मंदिर कार्यालय, व्हिआयपी कक्ष आणि परिसरात मोठ्या प्रमाणात पाणी शिरले. यामुळे या नाट्यगृहाच्या समस्येत आणखी भर पडली. येथील व्यवस्थापक प्रदीप जोशी यांना स्वतः हातात खराटा घेऊन साफसफाई करावी लागली.

पावसामुळे हुतात्मा स्मृती मंदिर परिसर आणि कार्यालयात पाणी शिरले होते. ड्रेनेजचे पाणी आत आल्यानंतर स्मृती मंदिरचे व्यवस्थापक प्रदीप जोशी यांनी स्वतः हातात खराटा घेऊन



साफसफाई केली. ड्रेनेजचे पाणी हुतात्मा स्मृती मंदिरच्या व्हीआयपी कक्षासह परिसरात शिरल्याचे दिसून आले. परवाच सिने अभिनेते प्रशांत दामले यांनी या हुतात्मा स्मृती मंदिरची पाहणी करून दुरावस्थेबद्दल नाराजी व्यक्त केली होती. मेकअप रूम मधील एअर कंडिशन बंद त्याचबरोबर नाट्यगृहातील ४० खुर्च्या तुटलेल्या आहेत यासह विविध अडचणी थेट महापालिकेत जाऊन अतिरिक्त आयुक्त यांच्याकडे मांडल्या होत्या. त्यातच आज अवकाळी पावसाने ड्रेनेज लाईन तुंबून या नाट्यगृहाच्या कार्यालयात व परिसरात पाणी शिरले. यामुळे कामकाजाचा खोळंबा झाला.